

# झेंड्यांचे रंगीबेरंगी जग

के. व्ही. सिंग

चित्रे

मीनू सरीन

*नेहरू बाल पुस्तकालय*

# झेंड्यांचे रंगीबेरंगी जग

**के. व्ही. सिंग**

अनुवाद

**श्रुती मुरकुटकर**

चित्रे

**मीनू सरीन**

nbt.india
एकः सूते सकलम्

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

ISBN 978-81-237-6318-7

पहिली आवृत्ती : 2014 *(शके* 1936)

© के. व्ही. सिंह

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

The Colourful World of Flags *(English Original)*
Zendyanche Rangiberangi Jag *(Marathi)*

₹ **160.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.
www.nbtindia.gov.in

# झेंड्यांचे रंगीबेरंगी जग

झेंड्यांचे स्वतःचे असे रंगीबेरंगी जग असते हे जाणून तुमच्यातल्या काही जणांना आश्चर्य वाटेल. तुम्हाला या जगाचा शोध मात्र घ्यावा लागेल. वास्तविक या झेंड्यांनाही स्वतःचा प्रदीर्घ असा इतिहास आहे; एवढेच नव्हे तर त्यांची भाषाही आहे. ज्याद्वारे ते माहितीचे आदानप्रदान करतात, संदेश अभिव्यक्त करतात. झेंडे विविध प्रकारचे आणि आकारांचे असतात. त्यांची एक विस्तृत नियमावली असते, ज्यानुसार वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्ताने झेंडे फडकवले जातात.

काही झेंडे सरकारी इमारती, व्यापारी संकुले, राजकीय आणि सामाजिक संस्थांवर फडकत असतात.



*चित्र १ : भारतीय संसद भवन*



*चित्र २ : झेंड्यांचे उपयोग*

अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या मोटारींवर काही झेंडे दिमाखात फडकत असतात तर; काही जहाजांवर सफर करतात. पर्वतराजींच्या शिखरावरही झेंडे फडकवण्यात येतात. अमेरिका आणि रशियाचे अंतराळवीर चंद्रावर गेले तेव्हा आपल्या विजयी आगमनाची खूण म्हणून तिथेही त्यांनी आपापल्या देशांचे झेंडे रोवले होते.


हे सर्व जाणल्यानंतर, आता एक प्रश्न तुमच्या डोक्यात सहजच येईल की, झेंडा म्हणजे काय?

झेंडा म्हणजे ध्वजखांबाला अडकवलेला कापडाचा तुकडा नव्हे. ते एक राष्ट्र, कुटुंब, समूह किंवा एखाद्या श्रद्धेचे प्रतीक असते. याच कारणास्तव आदिमकाळापासून आपल्या राष्ट्र-ध्वजासाठी लोक प्राणांचे बलिदान देत आले आहेत.

# झेंड्यांचा जन्म

आदिमानव छोट्या-छोट्या कुटुंबांमध्ये आणि जमातीसोबत निसर्गाच्या सानिध्यात राहत होता. त्यांच्या दैनंदिन जीवनातल्या वापरातील वस्तूंना ते मान देत, त्यांची पूजा करत. ही वापरातील साधने कुटुंबाची, जमातीची बोधचिन्हे किंवा निशाणी बनत.


हीच बोधचिन्हे, निशाण्या शांतीच्या वेळी घरांवर आणि युद्धाच्यावेळी रणांगणावरही फडकवली जात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे नेता येण्यासाठी बोधचिन्हे, निशाण्या, प्रतीक आणि रंगांना हाताळण्याकरता हलक्या वस्तूंचा वापर केला जाई. काठ्या, झाडांच्या फांद्या आणि मग कपड्याचा वापर करण्यात येई. अशाप्रकारे गरजेतून झेंड्यांचे अस्तित्व निर्माण होऊ लागले.



*चित्र ३ : प्राचीन चिन्हे*

युद्धप्रसंगी आयोजन करताना निशाणी उठून दिसावी म्हणून विशिष्ट पद्धतीच्या झेंड्यांचा उपयोग करण्याची कल्पना पुढे आली. युद्धकाळात मोठ्या प्रमाणात असलेल्या सैनिकांना आपल्या गटाच्या हालचाली आणि दिशा कळाव्यात म्हणून रणांगणावर झेंड्याचा वापर केला जाई.

रणांगणावर झेंडे नेण्याची प्रथा मिस्रवासी, असीरियनवासी, युनान-वासी, यवन, चिनी तसेच इतरां मध्ये प्रचलित होती. युद्धकाळात ईराणी सैनिक भाल्याच्या टोकावर गिधाडाचे चित्र डकवत होते तर; यहुदी सैनिक आपल्या ध्वजावर गरूडाचे चित्र रेखाटत होते. चिनी लोकांच्या झेंड्यावर प्रतीक म्हणून ड्रॅगन, पांढरा वाघ किंवा सापाचे चित्र रेखाटले जात होते. सिंधू संस्कृतीच्या काळात भारतीयांच्या ध्वजावर एक एकशिंगी काल्पनिक घोड्याचे चित्र आणि एका धूपदानीचे चित्र रेखाटलेले असायचे.



चित्र ४ : इजिप्तचा एक ध्वज

# देवालये आणि तीर्थस्थानांवरील झेंडे

प्राचीन काळात झेंड्यांचे धार्मिक महत्त्वही होते. भारतीय ध्वजांना पवित्र व पूजनीय वस्तू मानण्यात यायचे याबद्दल पुरेसे पुरावे पुराणात सापडतात. ध्वज-दान किंवा देवळात धातूने मढलेल्या लाकडी ध्वजदांड्याची स्थापना करणे म्हणजे एक फारच मोठे पुण्याचे काम समजले जाई. विविध देवी-देवता जे ध्वज धारण करायचे आणि फडकवायचे त्यांचे पुराणांमध्ये सविस्तर वर्णन आढळते.

जैन-धर्मीय राजे देवळांत ध्वज-दान करत असत असे आदी पुराणात लिहिलेले आढळते. या तथ्याला बळकटी देणारे अनेक प्रसंग पुराणांमध्ये आढळतात. पाली ध्वज हा जैन तीर्थस्थानाचा महत्त्वपूर्ण भाग असायचा. पाली-ध्वजामध्ये भगवा, पिवळा, पांढरा, हिरवा आणि काळा अशा पाच



*चित्र ५ : भगवान महावीर आणि जैन पाली ध्वज*

रंगांच्या पट्ट्या असायच्या, ज्यांच्या मध्यावर स्वस्तिकाचे शुभचिन्ह चितारलेले असायचे. अगदी हल्लीही असा झेंडा जैन तीर्थस्थानांवर फडकताना पाहायला मिळतो. कापडी झेंड्यांव्यतिरिक्त धातूचे झेंडेही वापरले जात. प्रामुख्याने तांबा-पितळेचे झेंडे तीर्थस्थानांच्या शिखरावर असत, आजही ते दिसतात.

बौद्धांनीही आपल्या धर्मप्रसारासाठी झेंड्यांचा वापर केला आणि आपल्या विहारांवर रंगीबेरंगी पताका फडकवल्या. आजही बौद्ध विहारांवर रंगीबेरंगी झेंडे आणि झालरीच्या पताका फडकताना आपल्याला दिसतात.

अनेक आधुनिक हिंदू देवळांवर लाल किंवा भगव्या रंगांचे सुती व रेशमी झेंडे दिसतात. तर मुसलमानांच्या मशिदीवर गडद हिरव्या रंगांचे 'परचम' (झेंडे) डोलत असतात. परंतु, ईसाई धर्माचे अनुयायी आपल्या चर्चवर कुठल्याच प्रकारचे झेंडे लावत नाहीत. शिखांच्या गुरुद्वारांमध्ये एक उंचच उंच असा ध्वज-दंड लावलेला असतो ज्याला ते 'झंडासाहिब' म्हणतात. त्यावर गडद पिवळ्या रंगाची एक त्रिकोणी पताका फडकवली जाते आणि ध्वज-दंडाचा उर्वरीत भागही पूर्णपणे त्याच रंगाच्या कपड्याने लपेटलेला असतो.


# प्राचीन आणि मध्ययुगीन भारतातील झेंडे

सिंधू संस्कृतीतही लोक झेंड्याचा वापर करत असल्याचे पुरावे भारताच्या इतिहासात सापडतात. असे मानले जाते की, आर्यांनी घुसखोरी करताना अनेक झेंड्यांचा उपयोग केला भारतात राहणाऱ्या मूळ आदिवासींनीही त्यांना झेंड्यांनी विरोध केला.

खिस्तपूर्व ३२७ मध्ये अलेक्झांडरने भारतावर हल्ला चढवला त्यावेळी पौरस राजाच्या सैन्याने त्याचा विरोध फौजेच्या पुढे 'हर्क्युलस'ची प्रतिमा असलेल्या झेंड्याने केला होता. मौर्य आणि गुप्तांच्या शासनात त्यांच्या राजघराण्यांचे प्रतीक म्हणून पौराणिक गरूड ध्वजाच्या स्वीकार केला गेला.



*चित्र ६ : स्तूपावर फडकणारे बौद्धांचे ध्वज*



चित्र ७ : मौर्यांचा गरूड ध्वज

सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यानंतर बौद्ध धर्माचे महत्त्व कळावे म्हणून त्याने अनेक ठिकाणी धर्म संदेशाच्या प्रचारार्थ अनेक ध्वज-स्तंभ उभारले. आपल्या राष्ट्रीय झेंड्यावर जे धर्म चक्र दिसते ते सम्राट अशोकाने वसवलेल्या सारनाथच्या राजधानीशी निगडीत आहे.

जेव्हा मुसलमान भारतात आले तेव्हा ते त्यांचे चिन्हे, झेंडे, पताका घेऊन आले. त्यातून इस्लामची संस्कृती झळकते. परंतु हिंदू आणि मुसलमानांत एक साधर्म्य दिसते. आपापल्या धर्माशी निगडीत असलेल्या झेंड्यांप्रती असलेली त्यांची शक्ती आणि प्रेरणा समान आहे.

मध्ययुगातले शासनकर्ते असलेले राजपूत त्यांच्या राजेशाही राहणीमानाचे प्रतीक म्हणून झेंडे वापरत. चित्तौडचे राणा सूर्यवंशीय असल्याने ते झेंड्यावर त्यांच्या देवतेचे म्हणजे सूर्याचे चिन्ह ठेवत. तांबड्या रंगांवर हा सूर्य उठून दिसे. त्याला *चांगी* असे नाव होते.

हल्दीघाटीच्या युद्धादरम्यान मुघलांनी महाराणा प्रतापांना घेराव घातला. त्यावेळी झालाच्या सरदार म्हणजे महाराणांच्या एका प्रमुखाने

चित्तौडचा झेंडा 'चांगी' जप्त केला आणि स्वतःच्या डोक्यावर धरला. मुघलांचे सैनिक सरदार मानालाच राणा प्रताप समजून त्यांच्यावर तुटून पडले. त्यांनी शत्रूला चकवण्याच्या या युद्धनितीचा अंगीकार करत मेवाडच्या चांगीवर असलेल्या सूर्याला आपल्या शिरावर धरले. त्यांचा या धरिष्ट्यामुळे महाराणा प्रतापांचे प्राण वाचले.

मध्ययुगीन राजपूत शासनकर्त्यांच्या काही वारसांचे १९७१ पर्यंत राजकीय अस्तित्व होते. पण १५ ऑगस्ट १९७१ रोजी त्यांना सरकारकडून मिळणारा खर्च बंद झाला. या दिवसापर्यंत ते देशातले राजे हाते, ते वारसाने चालत आलेले झेंडे आणि चिन्हे वापरत असत. बिकानेर राज्याचा ध्वज दोन रंगांचा होता. तांबडा आणि केशरी रंगावर पतंगाची आकृती असे. जोधपूरच्या झेंड्याला पंचरंग म्हटले जाई. तो पाच रंगांनी बनलेला होता. त्यावरही पतंगाची आकृती होती.

शिवाजींचे वडील शहाजी भगवा झेंडा वापरत. शिवाजी महाराजांचे मात्र दोन झेंडे होते. त्यांना छत्रपती ही उपाधी मिळाल्यावर दुसरा झेंडा निर्माण झाला. वडिलांच्या भगव्या झेंड्यावर जरी-पटका आला. त्यांच्या राजेशाहीला शान आली.

आपल्या सैन्यात उत्तम कामगिरी बजावणाऱ्यांचा जरी-पटका देऊन सन्मान करण्याची पद्धत मराठे पाळत.

मराठ्यांची ही रीत पुढे मुसलमानांनीही आत्मसात केली. युद्धात उत्तम कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान मराठ्यांच्या रीतीने मुसलमान करू लागले.

गझनीचा मोहम्मद जेव्हा भारतावर चाल करून आला तेव्हा त्याने काळा झेंडा वापरला होता. त्यावर चंद्रकोर होती. पृथ्वीराज चौहान यांच्याशी ११९१ आणि ११९२ दरम्यान मोहम्मद घोरीने



*चित्र ८ : महाराणा प्रतापांचा ध्वज 'चांगी'*

दोन युद्धं केली. त्यावेळी घोरीने स्वतःचे झेंडे आणि पताका वापरल्या होत्या.

आपली राजचिन्हं म्हणून कुतुब-उद-ऐबक हा चंद्र आणि सिंह वापरत असे. गया-उद-दीन तुघलक आपल्या झेंड्यावर माशाचे चिन्ह वापरायचा. तुघलक राजांचा झेंड्यांचा वेगळा विभाग होता. त्याला आलम-खाना म्हणत.

सुलतानी राजवटीत अमीर, खान आणि इतरांना दर्जा देण्याची पद्धत भारतात रूढ होती. कदाचित भारतीयांसाठी ही पद्धत नवी होती. नंतर मुघलांनीही युद्धवीरांचा सन्मान करण्याची ही रीत अंगीकारली. भारताच्या सशस्त्र दलातर्फे बजावण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव राष्ट्रपतींकडून करण्यात येतो. त्यावेळी रंगांचा वापर केला जातो.

मुघलांचे राजेशाही प्रतीक म्हणजे आलम. ते हिरव्या आणि सोनेरी रंगांचे असायचे. हिरव्या रंगावर उगवता सूर्य आणि त्यावर गुरगुरणाऱ्या सिंहाचे चित्र असायचे. हा सिंह ध्वज खांबाच्या दिशेला तोंड करून असायचा.



*चित्र ९ : जोधपूर संस्थानाचा झेंडा*




*चित्र १० : छत्रपती शिवाजींचा भगवा झेंडा*

राजचिन्ह हे नेहमी सिंहासनाच्या उजवीकडे असावे अशी मुघलांची प्रथा होती. जेव्हा एखाद्या ठिकाणी राजेशाही डेरा दाखल होई तेव्हा राज तंबूबाहेर राजचिन्ह फडकत असे. आपणही आपला राष्ट्रध्वज फडकवताना आज या प्रथा पाळतो. त्याविषयीची अधिक माहिती भारतीय ध्वज नियमावलीत दिली आहे. (संदर्भ–शेवटचा भाग)

मध्ययुगीन काळातही झेंडे, राजचिन्हे, पताका मिरवणुकीतून फिरवण्याची प्रथा होती. जेव्हा सम्राट राजगृहाबाहेर पडत तेव्हा त्यांच्याबरोबर पाच झेंडे असत. झेंडे आणि राजचिन्हे लाल रंगाच्या कापडी बॅगेत घेऊन जाण्याची पद्धत होती. सम्राट शहाजानच्या काळात १९ ते २० हत्तींवरून राजचिन्हांची ने–आण करण्यात येई. हत्तींमागे पूर्ण खोगीर घातलेले ९ घोडे असत. त्यांच्यामागे असलेले दोन शिपाई सम्राटाच्या आगमनाची घोषणा करत.

ही ध्वज-पदचिन्हे, अधिकारचिन्हे आणि सन्मानचिन्हे सण-समारंभाच्या वेळी वापरली जातात. ज्याप्रमाणे आपण प्रजासत्ताक दिन साजरा करतो. त्याच पद्धतीने यातले वेगळेपण म्हणजे जुनी शस्त्रे आधुनिक पद्धतीने वापरणे. पण त्यामागची भावना मात्र समान आहे– आपले ध्येय गाठणे, सैन्यबळ, उन्नती आणि प्रगतीचे प्रदर्शन करणे.



*चित्र ११ : मुघलांचे राजचिन्ह 'आलम'*

# पौराणिक आणि महाकाव्य युगातले झेंडे

झेंड्याचे पौराणिक नाव म्हणजे ध्वज. काठीवर फडकत असलेला ध्वज म्हणजे सैन्याचे किंवा राजाचे प्रतीक होय. ध्वज प्रामुख्याने तीन घटकांनी बनलेला असतो. त्यातील पहिला घटक म्हणजे पताका, वाऱ्यावर फडकणारा कापडाचा तुकडा; दुसरा घटक, केतू म्हणजे पताकेवर असलेली नक्षी किंवा निशाणी. तिसरा घटक आहे पताका किंवा ध्वजाची ने-आण करण्यासाठी असलेली दांडी किंवा काठी म्हणजे यष्टी.







*चित्र १२ : भीष्म पितामहांच्या रथावरचा ताल-ध्वज*

अनेक विद्वान ध्वज आणि पताका या दोन शब्दांना समानार्थी वापरतात. परंतु, वास्तविक या दोन शब्दांच्या अर्थामध्ये फरक आहे. सर्वात मोठा फरक म्हणजे झेंड्यावर असलेले चिन्ह किंवा प्रतीक, ज्याला आपण 'केतु' म्हणतो ते रेखाटलेले असते. मात्र, पताकेवर याप्रमाणे कोणतेच चिन्ह नसते. पताका म्हणजे केवळ कापडाचा रंगीत किंवा पांढरा तुकडा असतो. दुसरा फरक म्हणजे झेंडा आणि पताका यांचा आकार वेगळा असतो. झेंड्याचा आकार चौकोनी असून पताका त्रिकोणी आकाराची असते. महाकाव्य युगात रथ, हत्तीवर स्वार असलेला योद्धा आणि घोडेस्वार सैनिक पताकांचा वापर मोठ्या प्रमाणावर करत असत.

भारतीय इतिहासात वेदिक काळात इंद्रदेव समस्त देवतांचे प्रमुख मानले जात. इंद्रध्वज या नावाचा त्यांचा झेंडा असे. महाभारतात दिलेल्या वर्णनावरून हा इंद्रध्वज चमकत्या गडद रंगाचा असल्याचे कळते.



*चित्र १३ : दुर्योधन आपल्या ध्वजाबरोबर*

पुराणात असलेल्या देवता उदाहरणार्थ विष्णू आणि शिव यांचे स्वतःचे झेंडे होते. भगवान विष्णूच्या झेंड्यावर गरूडाचे चित्र असायचे. त्यामुळेच त्यांच्या झेंड्याला 'गरूड-ध्वज' नावाने ओळखले जाते. भगवान शिवाच्या झेंड्याला वृषभ-ध्वज म्हटले जायचे. कारण त्यांच्या ध्वजावर त्यांचे प्रिय वाहन असलेल्या नंदीचे चित्र रेखाटलेले होते.

पुराणात राजा आणि अन्य योद्ध्यांमध्ये खासगी झेंडा बाळगव्याची सामान्य प्रथा होती. या प्रथेनुसार त्या युगातले योद्धे आणि राजे आपापल्या योग्यता, आस्था, वंश, परंपरा आणि सैनिक संधीनुसार खासगी झेंडे बाळगत असत.



*चित्र १४ : इंद्रध्वज फडकवताना भगवान इंद्र*



चित्र १५ : भगवान विष्णू त्याच्या गरूड ध्वजासोबत

अयोद्धेच्या राजपुत्र श्रीरामाने आपल्या वंशाच्या झेंड्याला खासगी झेंडा मानले होते. त्यांच्या ध्वजावर त्यांचा कुलदेव सूर्य चितारलेला असायचा आणि त्याची पृष्ठभूमी भगव्या रंगाची होती. श्रीरामाचा छोटा भाऊ राजपुत्र भरत कोविंद्र ध्वज वापरत असे. त्याच्यावर दैवी वृक्षाची आकृती असे.

सम्राट रावण दोन झेंडे वापरायचा. त्यातील एक राज्यासाठी आणि एक त्याचा वैयक्तिक झेंडा होता. झेंड्यावर मानवी मस्तकाचे चित्र असे. त्याला कपाल-ध्वज (मानवी कवटी) असे नाव होते. हे कपाल भगवान शिवाचे प्रतीक. आपल्यावर शिवाचे आशीर्वाद



*चित्र १६ : रावणाने रथावर लावलेला त्याचा ध्वज*

राहावे म्हणून रावण हे प्रतीक झेंड्यावर वापरत असे. रावण हा चांगला संगीतज्ञ होता. तो वीणावादन करायचा. तो सर्व क्षेत्रात पारंगत होता. त्यामुळे साम्राज्याच्या झेंड्यावर वीणेचे चित्र होते. ते त्याच्या नम्रता, विद्वत्ता आणि सुख-समृद्धीचे प्रतीक होते.



*चित्र १७ : श्रीरामाने पुष्पक विमानावर आपला ध्वज असा फडकवला*

रावणाचा मुलगा मेघनाद याच्या झेंड्यावर सिंह डकवलेला असायचा. त्यामुळे त्या झेंड्याला मृगराज केतू असे संबोधण्यात येई. राजा रावणाचे इतर योद्धे म्हणजे प्रहस्त आणि कंभानन. त्यांच्या झेंड्यावर साप असे. शेषनाग हे त्यांच्या झेंड्याचे प्रतीक होते.

महाभारताच्या द्रोण पर्वात कौरव, तर शांती पर्वात कुरूक्षेत्राच्या युद्धात पांडवांनी वापरलेल्या झेंड्यांची सविस्तर माहिती दिलेली आढळते.

युधिष्ठिर हा ज्येष्ठ पांडव. त्याच्या झेंड्यावर मृदंगाची जोडी असे. त्यांना नाद आणि उप-नाद अशी नावे होती. भीम हा द्वितीय पांडव. तो सिंह-ध्वजाचा वापर करे. कुरूक्षेत्राचा नायक म्हणजे अर्जुन. तो कपि-ध्वज वापरायचा. कपि म्हणजे वानर (माकड)





चित्र १८ : भगवान शिव आपल्या वृषभ ध्वजाबरोबर

हनुमानाच्या लढवय्या वृत्तीचे ते प्रतीक होते. चौथा पांडव नकुल हा सरभा नामक आध्यात्मिक प्राण्याचे चित्र आपल्या ध्वजावर वापरत असे. तर धाकटा पांडव सहदेवच्या झेंड्यावर हंसाची प्रतिकृती असे. त्या ध्वजाला हंस-ध्वज असे नाव होते. सुभद्रा आणि अर्जुनाचा पुत्र अभिमन्यू याने आपल्या झेंड्यावरच्या प्रतिकासाठी सारंग पक्ष्याची निवड केली होती. बलाढ्य कृष्ण आणि देवाधिदेव भगवान विष्णूही प्रसिद्ध गरूड-ध्वज वापरायचे.

भीष्म पितामह हे महाभारतातील ज्येष्ठ योद्धे. त्यांच्या ध्वजाचे नाव ताल-ध्वज. त्यावर ताल वृक्ष आणि त्यासभोवती पाच ताऱ्यांचे मंडळ होते.


द्रोणाचार्य हे कौरव आणि पांडवांचे गुरुवर्य. त्यांच्या झेंड्यावर हरणाची कातडी असलेली वेदिका आणि कमंडलू तसेच धनुष्याची आकृती असे.


दुर्योधन हा कौरव राजपुत्र. त्याच्या रथावर सर्प-ध्वज फडकत असे. प्राचीन दस्तावेजानुसार सापाला ताकदीचे प्रतीक मानले जाई. शूर धनुर्धर दुर्दैवी ठरला. त्याच्या रथावर हस्ती काश्यमहर-केतू असे. हस्ती काश्यमहर म्हणजे हत्तींची साखळी. त्याच्या झेंड्यावर सूर्य असल्याचे काही दस्तावेजांनुसार कळते.

सिंधूराज जयद्रथ हा दुर्योधनाचा मेहुणा. त्याच्या झेंड्यावर वराहाचे (डुकराचे) चित्र असे. पांडवांचे मामा शल्य याने आपल्या ध्वजासाठी 'नांगर', ज्याला संस्कृतमध्ये सीता म्हणतात, त्याची निवड केली.

पौराणिक झेंड्याबरोबर काही रूढी आणि परंपरा जोडलेल्या आहेत. युद्धभूमीवर जाण्याआधी योद्धे रथावर ध्वज रोवत. अर्जुन रणभूमीवर जाण्याआधी पूजा-अर्चा करत असे. तो आपल्या 'नंदीघोष' या रथाला एक प्रदक्षिणा घालायचा. त्यानंतर तो सशस्त्र होऊन कपि-ध्वज उंचावत असे.


महाभारत काळात रणभूमीवर जाताना झेंडा उंचावण्याची रीत योद्ध्यांमध्ये रूढ होती. विराटाचा मुलगा उत्तर याच्यासाठी कौरवांविरुद्ध लढायला अर्जुन सज्ज झाला. त्यावेळी त्याने उत्तराचा सिंह-ध्वज काढून त्याजागी आपला कपि-ध्वज फडकवला होता. कदाचित त्याला स्वतःच्या झेंड्याखाली हे युद्ध करायचे होते किंवा त्याला विराटाच्या सैन्यात पांडवांचे असलेले अस्तित्व दाखवायचे असेल. त्यावेळी त्याच्या अज्ञातवासाचे एक वर्ष लवकरच संपुष्टात येणार होते.





चित्र १९ : पुराणातील युद्धप्रसंग


पुराणकाळात योद्धे विरुद्ध पक्षाच्या शत्रूचे झेंडे नष्ट करण्यात अग्रेसर असत. अर्जुन आणि कर्णात रंगलेल्या अंतिम युद्धात अर्जुनाने प्रथम कर्णाचा झेंडा नष्ट केला. त्यानंतर त्याला मारले. रावणाला कंठस्नान घालण्याआधी रामाने त्याला अपमानित करण्यासाठी त्याचा झेंडा मोडला आणि मग त्याला ठार केले.



*चित्र २० : शत्रूचा झेंडा मोडीत काढताना*

# झेंड्यांची भाषा

झेंड्याची स्वतःची भाषा असते. त्यांचे प्रदर्शन बोलके असते. कारण वेगवेगळ्या झेंड्यांचा स्वतःचा अर्थ असतो. जेव्हा एखादा झेंडा विशिष्ट पद्धतीने फडकवला जातो तेव्हा त्याला अर्थ असतो. उदाहरणार्थ, जेव्हा एखाद्या काळ्या रंगाच्या चेंडूसदृश वस्तुखाली झेंडा




*चित्र २१ : ज्यावेळी जहाज समुद्र सफरीसाठी तयार असते तेव्हा 'पापा' नामक झेंडा फडकवला जातो*

फडकवला जातो तेव्हा त्याचा अर्थ, हे जहाज संकटात आहे, असा असतो. त्याला तातडीची मदत अपेक्षित असते.

पूर्वीच्या काळात झेंड्यांना युद्धभूमीवर अनन्यसाधारण महत्त्व होते. युद्धादरम्यान विरुद्ध सैन्याचा बिमोड करण्यासाठी किंवा त्यांच्या राजाला शोधण्यासाठी तसेच स्वतःच्या फौजांना दिशा देण्यासाठी झेंड्यांचा वापर केला जाई.




*चित्र २२ : झेंड्यावर असलेला काळा गोळा जहाज संकटात असल्याची सूचना देताना*

हे राष्ट्रपती भवन आहे. हे भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकृत निवासस्थान आहे. तुम्हाला कळसावर फडकणारा झेंडा दिसतोय? नाही! तो इमारतीवर फडकत नाहीये. मग त्याचा अर्थ काय? जेव्हा तिरंगा राष्ट्रपती भवनाच्या कळसावर फडकत नाही तेव्हा राष्ट्रपती भवनापासून दूर आहेत किंवा ते भवनात नाहीत असा त्याचा अर्थ होतो. जेव्हा ते परत येतात आणि मुख्य दरवाजातून त्यांचा आत प्रवेश होतो तेव्हा लगेच राष्ट्रध्वज इमारतीवर फडकवला जातो. राष्ट्रपती भवनात असल्याची ती खूण असते.

जहाजावर झेंडे महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांचे चिन्ह आणि राष्ट्रीय झेंडा याव्यतिरिक्त इतर अनेक प्रकारचे झेंडे जहाजावर असतात. अशा इतर झेंड्यांना अक्षर




*चित्र २३ : राष्ट्रपती भवन*




*चित्र २४ : अक्षर आणि संख्यादर्शक झेंडे*

आणि संख्यादर्शक झेंडे म्हणतात. प्रत्येक अक्षर (ए ते झेड) आणि अंकाकरता (० ते ९) झेंडे असतात. त्यांचा उपयोग एका जहाजातून दुसऱ्या जहाजाला किंवा जहाजातून किनाऱ्यापर्यंत संदेश पोहोचवण्याकरता होतो.

काही खास झेंडे जेव्हा त्यांना एका विशेष स्वरूपात प्रदर्शित केले जाते, तेव्हा





*चित्र २५ : चौकटी असलेला झेंडा म्हणजे शर्यतीचा शेवट*

त्यांच्यातून निराळाच अर्थ प्रतीत होतो. *पापा* नामक झेंड्यावर इंग्रजी वर्णमालेतील 'पी' असतो. त्याचे 'ब्ल्यू पीटर' हे नाव प्रसिद्ध आहे. जहाज समुद्र सफरीसाठी तयार असते तेव्हा हा झेंडा जहाजावर फडकवला जातो.

मोटार शर्यतीत (कार रेस) झेंडे महत्त्वाचे असतात. झेंड्यांचा इशारा देऊन वेगवान मोटार चालकांना आयोजक योग्य ती माहिती देतात. मग स्पर्धक झेंड्यांचे संकेत दिसताच संदेश जाणून घेण्यासाठी मोटारी तातडीने पिट्समध्ये नेतात. कारण मोटार मधेच थांबवून संदेश ऐकणे शक्य नसते. जेव्हा काळ्या-पांढऱ्या चौकटीचा झेंडा दाखवला जातो तेव्हा शर्यतीचा शेवट झाला असे समजले जाते.

एखाद्या जहाजावरचा झेंडा पाहून त्या जहाजाचे राष्ट्रीयत्व ओळखणे शक्य असते. जेव्हा एखादे जहाज दुसऱ्या जहाजाला पार करते तेव्हा एकमेकांना सलामी किंवा अभिवादन देण्याकरता दोन्ही जहाजांवर झेंडे हलवले जातात. समुद्रात सफर करताना जहाजांनी एकमेकांना अभिवादन करण्याची ही जुनी पद्धत आहे.



*मार्गावर तेल आहे*



*चालक पुढे जायच्या प्रयत्नात आहे*



*थांबा*

*चित्र २६ : मोटार शर्यतीशी संबंधित आणखी काही झेंडे*




*चित्र २७ : जहाजावर डौलाने उभा असलेला भारतीय राष्ट्रध्वज*

# झेंड्यांचे भाग




*चित्र २८ : आधुनिक झेंड्यांचे भाग*

एखाद्या झेंड्याला दोन टोकं असतात. त्यातील एक ध्वजस्तंभाच्या जवळ असते, तर दुसरे टोक स्तंभापासून दूर असते. इंग्रजीत झेंड्याच्या लगतच्या टोकाला 'होआईस्ट' (Hoist) असे म्हणतात, तर दूरच्या टोकाला 'फ्लाई' (Fly) म्हणतात. ज्या स्तंभावर ध्वज फडकवला जातो त्याला ध्वज-दंड किंवा डोलकाठी म्हणतात. झेंडा फडकण्याकरता जी दोरी असते तिला इंग्रजीत 'गायलाईन' किंवा 'हॉलयार्ड' सुद्धा म्हटले जाते.

भारतातील सर्वात मोठा ध्वजस्तंभ सेंट जॉर्ज किल्ला, मद्रास (आताचे चेन्नई) येथे स्थापित आहे. या ध्वजस्तंभाची उंची ४५.७ मीटर एवढी आहे. तो सागवानी लाकडापासून बनलेला आहे. १६८७ साली मद्रासचे गव्हर्नर येल यांनी सर्वप्रथम ध्वजस्तंभावर युनियन जॅक फडकवला. सध्या ज्या डोलकाठीवर तिरंगा फडकवला जातो ती काठी त्या ठिकाणी १७७० साली स्थापित केली होती.



*चित्र २९ : चर्चासत्राच्या टेबलावर असलेले छोटे राष्ट्रध्वज*

आंतरराष्ट्रीय शिखर परिषद, चर्चासत्रे, संमेलने आणि दोन देशांच्या प्रतिनिधींमध्ये सुरू असलेल्या संभाषणात ते विराजमान असलेल्या टेबलावर त्यांच्यासमोर संबंधित देशाचे झेंडे असतात. त्यातून त्या व्यक्तींचे राष्ट्रीयत्व स्पष्ट होते.

सामान्यपणे झेंडे हे डोलकाठीच्या वरच्या भागावर फडकवले जातात. पण काही प्रसंगी झेंडा काठीच्या मध्यावर फडकवला जातो. तुम्हाला माहिती आहे का जेव्हा झेंडा अर्ध्यावर उतरवला जातो, तेव्हा त्यातून राष्ट्रीय नेत्याचा किंवा अतिमहत्त्वाच्या व्यक्तीच्या मृत्यूचा दुखवटा सूचित करायचा असतो. मृत आत्म्याप्रती असलेल्या आदरापोटी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवला जातो. झेंडा अर्ध्यावर उतरवणे म्हणजे ध्वज-स्तंभाचे टोक आणि

गायलाईन यांच्यातील अंतराच्या अर्ध्यावर झेंडा आणणे. जर गायलाईन नसेल तर ध्वज-स्तंभाच्या मध्यावर झेंडा आणला जातो.

झेंडा अर्ध्यावर आणण्याची प्रथा स्पेनमध्ये सुरू झाली. साधारण १९१२च्या दरम्यान शेजारील देशाबरोबर झालेल्या समुद्र युद्धात नौसेना प्रमुखाच्या मृत्यूचा दुखवटा झेंडा मध्यावर उतरवून करण्यात आला. त्यानंतर शोक प्रदर्शित करण्यासाठी झेंडा अर्ध्यावर उतरवण्याची प्रथा जगभर सुरू झाली.




*चित्र ३० : अर्ध्यावर उतरवलेला भारताचा राष्ट्रध्वज*

# एकरंगी झेंडे

सामान्यपणे झेंड्यात एकाहून जास्त रंग असतात. पण फक्त एक रंगाचे झेंडे असतात. उदाहरणार्थ पांढरा, लाल, हिरवा, पिवळा आणि काळ्या रंगांचे झेंडे दिसतात. पांढरा हा रंग पावित्र्य आणि शांतीसाठी वापरला जातो. जर या रंगाचा झेंडा युद्धाच्या वेळी वापरला गेला तर त्याचा अर्थ युद्धविराम किंवा शरण असा होतो. घेरावबंदीच्या काळात जर सैन्याने पांढरा झेंडा दाखवला तर त्याचा अर्थ लढाई थांबवणे असा होतो. आश्चर्याची बाब अशी की चीनमध्ये पांढरा रंग शोक, दुःखाशी संबंधित आहे.

लाल रंग हा धोका किंवा आगाऊ सूचना देण्याकरता वापरला जातो. रायफल रेंजजवळ जेव्हा गोळीबार चालू असतो तेव्हा सभोवती लाल झेंडे जवळ धोका असल्याचे सूचित करतात. त्याचप्रमाणे जहाज किंवा लष्करी वाहनातून स्फोटकं वाहून नेली जातात तेव्हाही अशा तऱ्हेने लाल झेंडा लावला गेला पाहिजे. त्यामुळे योग्य ती चेतावणी आणि धोक्याचे संदेश मिळतील.



*चित्र ३१ : स्फोटक वाहून नेणाऱ्या वाहनावर असलेला लाल झेंडा आणि कंदील*



चित्र ३२ : आत्मसमर्पण चिन्ह असलेला पांढरा झेंडा

जेव्हा तुम्हाला स्विमिंग पुलावर (तरण तलाव) लाल झेंडा दिसतो तेव्हा तो तलाव पोहण्याकरता बंद आहे असे समजावे. या विपरीत चिनी लोक लाल रंगाला आनंदाचा रंग मानतात.

लाल रंग धोका सूचित करतो. त्यामुळे रस्त्याच्या नियमांनुसार लोखंडी सळ्या किंवा तस्सम वस्तू, स्फोटकांची ने-आण करताना सकाळी असा लाल रंगाचा झेंडा वाहनांवर असावा. रात्रीच्या वेळी लाल रंगाचा दिवा असलेला कंदील लावावा.

या विरुद्ध हिरव्या रंगाचा वापर केला जातो. हिरवा झेंडा म्हणजे सगळे सुरळीत आहे. ट्रेनचे इंजिन बंद होण्यासाठी रेल्वे गार्ड हिरवा झेंडा दाखवतो. तरण तलावावर जेव्हा हिरवा झेंडा असतो त्याचा अर्थ तलाव पोहण्यासाठी खुला आहे.



*चित्र ३३ : स्विमिंग पूलवर असलेल्या लाल झेंड्याचा अर्थ तलाव पोहण्यासाठी बंद आहे*




चित्र ३४ : समुद्री चाच्यांचा काळा झेंडा

पिवळा झेंडा आजारीपणा किंवा अस्वच्छता दर्शवण्यासाठी वापरला जातो. या कारणामुळे ज्या ठिकाणी साथीचे रोग पसरले असतील त्या ठिकाणी असे झेंडे दिसतात. त्याचप्रमाणे जिथे शौचालये किंवा मुत्रालये असतात, तिथे जास्त लोक गोळा होण्याची शक्यता असते ती जागा सहज ओळखू येण्याकरता हे झेंडे वापरले जातात.

काळ्या रंगाचा झेंडा मृत्यू, शोक किंवा नाराजी दाखवण्याकरता वापरला जातो. फार पूर्वी तुरुंगात कैद्याला फाशी दिल्यावर काळा झेंडा फडकवला जाई. नजीकच्या काळात इतर जहाजांच्या चालकांवर दहशत असावी म्हणून समुद्री चाचे काळ्या झेंड्यावर पांढरी कवटी आणि त्यावर दोन हाडे असलेले चित्र वापरायचे.

आधुनिक काळात कर्मचारी वर्ग व्यवस्थापनावर असलेला रोष सभ्यपणे दाखवण्याकरता काळ्या रंगाचे छोटे-छोटे कापडी तुकडे आपल्या पोशाखावर लावतात.


# जागतिक संस्थांचे झेंडे



*चित्र ३५ : यू.एन.ओ.चा झेंडा*

काही झेंडे असतात जे आपल्याला रेड क्रॉस, यू.एन.ओ., स्काऊटसारख्या जगप्रसिद्ध संस्थांची माहिती देतात. हा झेंडा रेड क्रॉस संस्थेचा आहे. ही संस्था शांतता आणि युद्धकाळात संकटात सापडलेल्या लोकांची मदत करते. निर्वासित छावव्या किंवा जत्रेत जर तुम्ही एखाद्या तंबूवर रेड क्रॉसचा झेंडा फडकत असलेला पाहिला तर तुम्हाला निश्चितपणे अंदाज येईल की, त्याठिकाणी वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहे.

हा झेंडा संयुक्त राष्ट्रसंघाचा आहे. ही संस्था विश्वाच्या शांततेसाठी प्रयत्न करते. याच कारणासाठी हिच्या झेंड्याच्या मध्यभागी जगाचा एक नकाशा बनवला आहे. ज्याला




चित्र ३६ : मुस्लीम देशांतील रेड-क्रॉसचे चिन्ह

निळ्या पृष्ठभूमीवर शांततेचे प्रतीक असलेल्या 'ऑलिव्ह' वृक्षाच्या दोन फांद्यांनी वेढलेले दर्शविण्यात आले आहे. एखाद्या मोटार किंवा दुचाकीवर रेड क्रॉसचे चिन्ह पाहता तेव्हा ते वाहन एखाद्या डॉक्टरचे आहे असा त्याचा अर्थ होतो.

एकातऱ्हेने पाहिल्यास रेड क्रॉस संस्थेचा झेंडा वेगळा आणि विशेष आहे. कारण या झेंड्याची तीन वेगवेगळी रूपे आहेत. जगात जवळपास सर्वत्र रेड क्रॉसचे पारंपरिक चिन्ह वापरले जाते. पांढऱ्या पार्श्वभूमीवर लाल बेरजेचे चिन्ह असते. पण मुस्लीम देशांत रेड क्रॉसच्या ठिकाणी लाल चंद्रकोर वापरली जाते.

त्याशिवाय इराणमध्ये रेड क्रॉस संघटनेचे वेगळे चिन्ह आहे. जिथे झेंड्यावर लाल रंगाच्या सिंहाने हातात धरलेली तलवार आणि त्यापाठी उगवता सूर्य अशी पार्श्वभूमी असते.

तुम्ही कधी स्काऊटच्या सलामीची पद्धत पाहिली आहे? तो आपली तीन बोटं दुमडून सलामी देतो. ज्या दिवशी तो स्काऊटमध्ये प्रवेश करतो तेव्हा त्याने घेतलेल्या तीन वचनांचे प्रतीक म्हणजे ती तीन बोटं. झेंड्यावर गडद हिरव्या रंगाच्या पानांवर लिलीच्या फुलाला असलेली तीन पाने स्काऊटला त्या तीन वचनांचे स्मरण करून देतात. हे वचन संस्थेत दाखल होताना घेतले जाते. त्यातले पहिले वचन—चांगला नागरिक बनण्याचे. दुसऱ्याला मदत करणे हे द्वितीय वचन. आरोग्यदायी सवयी अंगी बाणवणे हे तिसरे वचन होय.



*चित्र ३७ : इराणचा रेड क्रॉस झेंडा*

हा झेंडा ऑलम्पिक खेळांचा आहे. ऑलम्पिक खेळाच्या झेंड्यावर पाच समान वर्तुळं असतात. लाल, हिरवा, निळा, पिवळा आणि काळा अशा पाच रंगांची ती वर्तुळं असतात. हे पाच रंग जगातील पाच खंडांचे प्रतिनिधीत्व करतात. या वर्तुळांची एक गुंफण असते. फार पूर्वी गुंफलेली साखळी एकतेचे चिन्ह मानली जायची.



चित्र ३८ : ऑलम्पिकचा झेंडा




चित्र ३९ : स्काऊटचा झेंडा



चित्र ४० : झेंड्यांसोबत मार्च करणारे खेळाडू



*चित्र ४१ : निर्वासितांच्या छावण्यांवर असलेला रेड क्रॉसचा झेंडा*

देशाचा राष्ट्रध्वज संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतो. तो सन्मानाचे प्रतीक आहे. राष्ट्रध्वज देशाचे आदर्श, तत्त्वज्ञान, इतिहास, संस्कृती आणि महत्त्वाकांक्षेचे प्रतिनिधीत्व करतो. या कारणास्तव जेव्हा एखादा खेळाडू आशियाई खेळात सुवर्ण पदक जिंकतो तेव्हा सन्मान म्हणून पहिल्या स्थानावर त्याच्या/तिच्या देशाचा ध्वज फडकवला जातो.

# विविध आकार-प्रकारचे झेंडे


झेंडे हे विविध प्रकार, आकार आणि लांबी-रुंदींचे असतात. त्याचप्रमाणे त्यांची नावेही ठरतात. त्यापैकी काही प्रकारांची नावे : वैयक्तिक (स्टँडर्ड), सूचक (गिडॉन), फलकसदृश (बॅनर), प्रतीक (पेनेंट), निशाण्या (एन्साइन), पताका (बर्जी) आणि रंगीत (कलरफूल) झेंडे.

राज्याचा राजा किंवा राणी किंवा राज्यपालांचा स्वतःचा विशेष झेंडा असतो. त्याला वैयक्तिक (स्टँडर्ड) झेंडा म्हणतात. तो त्यांच्या अधिकृत निवासस्थानावर, मोटारींवर किंवा त्यांच्या स्वतःच्या वाहनांवर म्हणजे ते ज्या वाहनातून प्रवास करतात त्या ट्रेन किंवा विमानावरही असू शकतो. फार पूर्वी मोठ्या आकाराचे झेंडे वापरण्याची प्रथा होती. अनेकदा हे झेंडे स्थिर असत किंवा कधीतरी वापरात येत असत. दरम्यानच्या काळात अशा वापरासाठी विशेष संज्ञा रूढ झाली. त्यांच्यासाठी घोडदळीचे झेंडे हा परवलीचा शब्द बनला.

१५ ऑगस्ट १९७१पर्यंत भारताच्या राष्ट्रपतींचाही वैयक्तिक झेंडा होता. त्यावर चार समान आकाराचे चौकोन होते. दोन रंगांचा आलटून-पालटून वापर त्यात केलेला असे. लपकिरी लाल आणि गडद निळा असे ते दोन रंग या झेंड्यात होते. खालच्या बाजूला डावीकडच्या पावभागात दिल्लीच्या लाल किल्ल्यातील तराजूचे चित्र होते. हा तराजू समानता आणि न्यायाचे प्रतीक मानण्यात येई. त्यानंतर तपकिरी लाल रंगात अजिंठाच्या भित्तीचित्रातील हत्ती हा शक्तीचे प्रदर्शन करे. सारनाथच्या कमलपात्राचे चित्र चौकोनात असे, त्यातून समृद्धी सूचित होई आणि सर्वात वरच्या चौकोनात असलेले सारनाथचे अशोकचक्र भारताच्या एकतेची साक्ष देणारे होते.

१५ ऑगस्ट १९७७ रोजी संस्थाने खालसा झाली. त्यानंतर भारताच्या राष्ट्रपतींनाही वैयक्तिक झेंडा फडकवणे बंद करावे लागले. पुढे नेहमीच आपला राष्ट्रध्वज असलेला तिरंगा मानाने फडकत राहिला.

प्रत्यक्षात फलक (बॅनर) सदृश झेंडे हे आकाराने आयताकृती असतात. त्यांच्यावर




वैयक्तिक झेंडा



पताका ध्वज




इंग्रजी वर्णमालेतील एल अक्षराचा
झेंडा म्हणजे जहाजाने तातडीने
थांबण्याचा इशारा



फलकसदृश झेंडा (गाईड संघटना)




निशाणी (रॉयल नॅशनल
लाईफबोट इन्स्टिट्यूट)



बर्जी (रॉयल यॉट स्कॉर्डन)

*चित्र ४२ : वेगळ्या प्रकारचे झेंडे*



*चित्र ४३ : भारताच्या राष्ट्राध्यक्षांचा जुना झेंडा*

राजचिन्ह किंवा सैन्यचिन्ह बिंबवलेले असते. हल्ली व्यापारीपेठा, राजकीय संघटना, संस्थांचे झेंडे या पद्धतीचे असतात.

पताका झेंडा हा त्रिकोणी असून शेवटी एक टोक या पद्धतीच्या रचनेचा असतो. अशा पद्धतीचा झेंडा साधारणपणे नौदलाच्या जहाजांवर दिसतो. एखाद्या जहाजाने जर नियमांचे उल्लंघन केले तर त्याला 'डी-कमिशन' अर्थात समुद्रासाठी अयोग्य घोषित केले जाते. नौदलच्या प्रथा आणि रितीभातीप्रमाणे आदरपूर्वक झेंडा उतरवला जातो.

जहाजाच्या पाठीमागे निशाण (एन्साइन) फडकवले जाते. जगातील सगळी नौदले अशारितीने निशाण्या वापरतात. काही देश आपल्या जहाजांवर राष्ट्रध्वज निशाणी म्हणून वापरतात. भारतीय नौदलाच्या निशाणीचा रंग पांढरा आहे. इंडियन मर्चंट नेव्हीतर्फे लाल रंगाची निशाणी वापरली जाते. जगातील काही हवाई दलेसुद्धा निशाण्या वापरतात.


बर्जी हा झेंड्याचा प्रकार पताका झेंड्याप्रमाणे असतो. तुम्ही रस्त्यावर धावणाऱ्या लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मोटारींचे निरीक्षण केले असेलच. त्यांच्या मोटारींवर छोट्या आकाराचे झेंडे फडकवलेले दिसतात. मोटारीवर फडकणाऱ्या त्या छोट्या झेंड्यांना इंग्रजीत 'बर्जी' असे म्हणतात.



*चित्र ४४ : भारतीय जहाजावर फडकत असलेला तिरंगा*



*चित्र ४५ : विमानावरचा भारतीय तिरंगा*



*चित्र ४६ : अत्यंत महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या मोटारीवरचा झेंडा*

फार पूर्वी घोडदळात मध्यम आकाराच्या झेंड्यांचा वापर होत असे. त्यांना सूचक (गिडॉन) झेंडे असे म्हणतात. या झेंड्याची टोकं हवेत मोकळी फडकत असतात. पूर्वी गट मार्गदर्शक हा लष्कर संचलनात सूचक झेंडे घेऊन पुढे चालत असे. सूचक झेंड्यांना इंग्रजीत 'गिडॉन' असे म्हणत असून तो इटालियन शब्द आहे.



*चित्र ४७ : बोटीवरचे निशाण (एन्साइन)*

# झेंड्यांशी संबंधित काही संज्ञा

झेंड्यांशी संबंधित असलेल्या संज्ञा इथे विषद कराव्याशा वाटतात. 'वेक्सिलोलॉजी' हा अभ्यास इतिहास, चिन्हे आणि झेंड्याच्या वापराशी संबंधित आहे. वृत्तपत्रं किंवा नियतकालिकं वाचताना 'फ्लॅग मार्च' हा शब्द अनेकदा वाचनात येतो. पण फ्लॅग मार्च म्हणजे काय हे तुम्हाला माहितीय का? ज्या शहरात अस्थिरता निर्माण झालेली असते तिथल्या रस्त्यावरून सशस्त्र दलाने काढलेली फेरी. जनतेला हिंसेविरुद्ध ताकीद देण्याकरता ही फेरी म्हणते फ्लॅग मार्च काढण्यात येतो. झेंड्याशी संबंधित शब्द पुढीलप्रमाणे :

**फ्लॅग डे (झेंडा दिन) :** झेंडा दिनाच्या दिवशी कागदी झेंड्याच्या विक्रीतून निधी जमवला जातो. हा निधी सशस्त्र दलाच्या जवानांकरता वापरण्यात येतो. आपल्या देशात ५ डिसेंबर हा दिवस झेंडा दिन म्हणून पाळण्यात येतो.


**ब्रेकिंग-दी-फ्लॅग (ध्वजारोहण) :** ध्वजस्तंभावर बांधलेला झेंडा त्याची दोरी ओढून फडकवला जातो. तो वाऱ्यावर डौलाने फडकतो त्यालाच ध्वजारोहण म्हणतात. वास्तविक दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाला आपले पंतप्रधान लाल किल्ल्यावरून ध्वजारोहण करतात.

**स्ट्राइकिंग-दी-फ्लॅग (झेंडा उतरवणे/ध्वजावतरण) :** एखाद्याला शरण आल्यास झेंडा उतरवला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटीशांचे अंतिम व्हाईसरॉय आणि भारताचे तत्कालीन राज्यपाल लॉर्ड लुईस माऊंटबेटन यांनी आताच्या संसद भवनावरून त्यांचा युनियन जॅक खाली उतरवला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरूंनी त्याजागी आपला तिरंगा डौलाने फडकवला. भारताच्या स्वातंत्र्यदिनाला युनियन जॅक खाली उतरवून लॉर्ड लुईस माऊंटबेटन यांनी शरण पत्करले. हे झेंडा उतरवण्याचे उत्तम उदाहरण आहे.

**फ्लॅग-ट्रूस (झेंडा उंच ठेवत खाली-वर करणे) :** म्हणजे पांढऱ्या रंगाचा ध्वज दाखवत किंवा तो घेऊन शत्रूच्या गोटात जाणे. याचा अर्थ शत्रूला शरण येणे असा आहे. पूर्वीच्या काळी आत्मसमर्पण करताना हरलेली सेना फ्लॅग ट्रूसद्वारा युद्धविराम दर्शवायची.

**डिपिंग-दी-फ्लॅग (झेंडा तिरका करणे) :** झेंडा किंचित तिरका करण्याची पद्धत फार जुनी आहे. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीच्या सन्मानार्थ किंवा समुद्रात चाललेल्या जहाजाला अशाप्रकारे मानवंदना देण्याची रीत आहे. हा मान दिल्यानंतर ध्वज तातडीने उंचावला जातो. समुद्रात एकमेकांना ओलांडून जाणाऱ्या जहाजाला सलामी देण्याची ही पद्धत आहे.


**फ्लॅग बेअरर (ध्वज वाहक) :** ज्याच्या हातात झेंडा असतो त्याला ध्वज वाहक (फ्लॅग बेअरर) म्हणतात. जेव्हा खेळाडू स्पर्धेत आपल्या देशाचे प्रतिनिधीत्व करतात तेव्हा चमूच्या एका खेळाडूच्या हातात झेंडा असतो. त्या व्यक्तीला 'ध्वज वाहक' म्हणतात.



*चित्र ४८ : ध्वज वाहक झेंड्यांसोबत सलामी देताना*

# आपल्या राष्ट्रध्वजाची विकास गाथा

आपला राष्ट्रध्वज म्हणजे तिरंगा खूप जुना पण रंगीबेरंगी आहे. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात १८५७ साली बहादूरशहा जफर यांनी स्वातंत्र्याकरता पहिल्यांदा झेंडा फडकवला. बहादूरशहाने स्वातंत्र्याच्या त्या झेंड्यावर कमळाचे एक फूल आणि चपातीचे चिन्ह बनवले होते. या झेंड्याभोवती चारबाजूंनी सोनेरी झालरही होती.



*चित्र ४९ : १८५७च्या स्वातंत्र्यलढ्यातील बहादूरशहा जफरचा झेंडा*




चित्र ५० : भगिनी निवेदितेचा झेंडा

१९०५ साली भगिनी निवेदितेने स्वातंत्र्य संघर्ष जिवंत ठेवण्यासाठी लाल पार्श्वभूमीवर चौकट असलेला झेंडा स्वीकारला. झेंड्याच्या काठावर १०८ ज्योती आणि पिवळ्या रंगाचे वज्र (भगवान इंद्राचे शस्त्र) होते. हे वज्र झेंड्याच्या मध्यावर असून त्याच्या डावीकडे वंदे तर उजवीकडे मातरम् असे बंगाली भाषेत लिहिलेले होते.




*चित्र ५१ : कलकत्ता झेंडा - १९०६*

१९०६ मध्ये पहिल्यांदा कलकत्ता झेंड्याच्या रूपाने स्वातंत्र्यसंग्रामात पहिल्यांदा तिरंग्याचा वापर झाला. या झेंड्यात हिरवा, पिवळा आणि लाल अशा तीन रंगांचा उपयोग करण्यात आला होता. हिरव्या रंगावर आठ अर्धवट स्वरूपात उघडलेली कमळं तर पिवळ्या रंगावर निळ्या रंगात 'वंदे मातरम्' असे शब्द होते. खालच्या लाल पट्ट्यावर पांढऱ्या रंगात चंद्र आणि सूर्य दिसायचे. ७ ऑगस्ट १९०६ रोजी हा झेंडा पहिल्यांदा पारसी बागान स्क्वेअर इथे फडकवण्यात आला.

'कलकत्ता झेंड्या'शी साधर्म्य राखणारा झेंडा स्वातंत्र्यसंग्रामात पहिल्यांदा परकीय मातीत रोवला गेला. २२ ऑगस्ट १९०७ रोजी मॅडम भिकाजी कामा यांनी जर्मनीत स्टुटगार्ट येथे हा झेंडा फडकवला. कलकत्ता झेंड्याप्रमाणे मॅडम कामा झेंड्यात गडद




*चित्र ५२ : मॅडम भिकाजी कामा यांचा झेंडा - १९०७, जर्मनी*

हिरवा, सोनेरी आणि लाल असे तीन समान पट्टे असत. वरच्या गडद हिरव्या पट्ट्यावर रांगेत अर्धवट उघडलेली आठ कमळं होती. तर मधल्या सोनेरी रंगावर देवनागरीत वंदे मातरम् असे पांढऱ्या रंगात लिहिलेले असायचे. खालच्या लाल रंगावर सूर्य आणि चंद्र दिसायचे.

१९१७ साली होमरूल लीगच्या बाळ गंगाधर टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांनी स्वातंत्र्य चळवळीकरता नवा झेंडा बनवला. होमरूलच्या झेंड्यावर पाच लाल तर चार हिरवे आडवे पट्टे असत. ते एकाखालोखाल एक रंग अशा पद्धतीने असत. त्यावर असलेले सात तारे म्हणजे सप्तर्षी. झेंड्याच्या डावीकडे वर एका चौकटीत युनियन जॅक असे. तर उजव्या बाजूला वर



*चित्र ५३ : होमरूल लीगचा झेंडा - १९१७*

चंद्रकोर आणि चांदणी असे.

गांधीजींचा झेंडा १९२१ मध्ये अस्तित्वात आला. त्यात पांढरा, हिरवा आणि लाल असे तीन समान रंगांचे पट्टे होते. मध्यावर मोठा चरखा होता. हे तीन रंग भारतातील विविध समाजाचे प्रतिनिधीत्व करत होते. त्यामुळे या झेंड्यावर टीका झाली. १९३१ साली तो बदलण्यात आला. नव्या झेंड्यात तीन रंग होते. भगवा, पांढरा आणि हिरवा असे ते तीन रंग. या झेंड्यावर मध्यभागी पांढऱ्या पट्ट्यावर छोटा चरखा होता. त्यामुळे १९३१ चा हा झेंडा



*चित्र ५४ : ध्वज समितीने (१९३१) सुचवलेल्या या झेंड्याचा वापर कधीच झाला नाही*

जातीय टीकेपासून मुक्त होता.

शेवटी ३ जून १९४७ रोजी भारताला स्वतंत्र करण्याचा निर्णय ब्रिटीश सरकारने घेतला. १५ जून १९४७ ही तारीख निश्चित झाली. विधानसभेने स्वतंत्र भारताच्या झेंड्याकरता ध्वजसमितीची स्थापना केली. या समितीला स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज बनवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

या समितीने तयार केलेल्या ध्वजाच्या नमुन्याला २२ जुलै १९४७ रोजी भारताचा राष्ट्रध्वज म्हणून संमत करण्यात आले.

आपल्या राष्ट्रध्वजावर तीन समान आडवे पट्टे आहेत. आपण त्याला तिरंगा म्हणतो. कारण त्यात तीन महत्त्वाचे रंग आहेत. भगवा (याला इंडियन सॅफरॉन असे सरकारी नाव आहे) सर्वात वरच्या अंगाला असतो. तो शौर्य, त्याग आणि निःस्वार्थीपणाचे प्रतीक आहे.



*चित्र ५५ : आयएनसीने १९३१ साली मान्य केलेला राष्ट्रध्वज*

मध्यावर असलेला पांढरा रंग पावित्र्य दर्शवतो. हिरवा (याला इंडियन ग्रीन असे सरकारी नाव आहे) रंग खालच्या अंगाला असून तो प्रगती आणि सुबत्ता दर्शवतो. मधल्या पांढऱ्या रंगावर चौथा रंग म्हणजे निळ्या रंगाचे अशोक चक्र. या चक्राला २४ आरे आहेत. हे निळे अशोक चक्र असीम विकासाचे द्योतक आहे. वर असलेले निळे आकाश आणि समुद्र किती अगाध आहे त्याचे हे प्रतीक. हे २४ आरे देशाच्या अविरत प्रगतीकडे लक्ष वेधतात. दिवसाचा २४ तासांच्या कालचक्राचे ते प्रतीक आहे.

# तिरंग्यातील रंग



*चित्र ५६ : तिरंगा - आपला राष्ट्रीय ध्वज*

भारताचा तिरंगा आपला राष्ट्रीय झेंडा व्हावा म्हणून नेहरूंनी रंगांवर भर दिला. झेंड्याच्या रंगावरून जातीय वाद होऊ नयेत हा त्यांचा हेतू होता. या झेंड्यात तीन रंग प्रमुख होते - भगवा, पांढरा आणि हिरवा हे ते रंग. दुय्यम रंग म्हणजे अशोक चक्राचा निळा रंग, प्रत्येक रंगांचे स्वतःचे असे अस्तित्व आहे.

**भगवा :** भगवा हा प्राचीन रंग असून बहुतेकदा भारतात त्याचा वापर होतो. आपल्या पवित्र भूमीतल्या देवी-देवतांच्या मूर्तीत या रंगाचा सर्रास

वापर आढळतो. भगवा रंग हा बुद्धिमत्तेचे आणि कार्यकुशलतेचे सुचिन्ह मानले जाते. हा रंग आगीचे प्रतिनिधीत्व करतो. खऱ्या संन्याशाने हा भगवा अहंकार जाळून राख करायचा असतो. त्यामुळे भगवा रंग संन्यासी निवडतो. डॉ. राधाकृष्णन यांच्या शब्दांत सांगायचे तर - ''लाल, नारिंगी, भगवा यातील भगवा रंग त्यागाची भावना स्पष्ट करतो. स्वतंत्र भारताच्या झेंड्यात भगवा रंगाच्या समावेशासाठी ध्वज-समितीने अनेक कल्पना आणि मतप्रवाह लक्षात घेतले.''

**पांढरा :** भारताच्या राष्ट्रीय झेंड्यात मध्यभागी पांढरा रंग आहे. डॉ. राधाकृष्णन यांच्या मते हा रंग सुर्याच्या किरणांचे चिन्ह आहे. पाढरा रंग प्रकाशाचा मार्ग अधोरेखित करतो. त्यामुळे आपण अंधारे ढग बाजूला सारून सत्याच्या प्रकाशाने, पारदर्शक साधेपणाने आपल्या वागणुकीवर ताबा ठेवला पाहिजे. पांढरा रंग हा निर्मळता, शुद्धता, संयमाचे वैश्विक चिन्ह आहे. त्याप्रमाणे हा रंग पवित्रता, अध्यात्मिकता, आणि शुचिता, संयम आणि निष्कपटता सूचित करतो.

**हिरवा :** बहुसंख्य भारतीय लोकसंख्या ज्या कृषी क्षेत्रावर आणि भाजीपाल्यावर अवलंबून आहेत त्याचे हिरवा रंग प्रतीक आहे. यावरून हे स्पष्ट होते की, फार पूर्वीपासून भारत शहरी संस्कृती जपणारा देश नसून कृषीप्रधान देश आहे. हिरवाईचे मूळ आश्रमांत आहे. डोंगरांच्या पायथ्याशी आहे. ज्या ऋषी-मुनींनी साधी जीवनशैली आणि उच्च विचारसरणी देशाला दिली. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पाया हे हिरवा निसर्ग आहे. हिरवा हा आशा आणि प्रेरणेचा रंग आहे.

**निळा :** अशोक चक्राचा निळा रंगही फार महत्त्वाचा आहे. अमर्याद आसमंत आणि खोल समुद्र निळाच आहे. अशोक चक्राचे चोवीस आरे देशाची सतत त्यादिशेने प्रगती आणि मार्गक्रमणा दर्शवतात.

थोडक्यात कायतर, भारताच्या राष्ट्रीय ध्वजाचे आरेखन करणाऱ्यांनी भारताची संस्कृती आणि भविष्यातील महत्त्वाकांक्षेचा विचार केला होता. त्याबरोबर रंगांचे महत्त्व लक्षात ठेवून तसा वापर झेंड्यात करण्यात आला हेच शेवटी स्पष्ट होते.


# तिरंग्याबद्दलचे रोचक वास्तव

- स्वतंत्र भारताला राष्ट्रीय ध्वज मिळावा, या गरजेतून भारताच्या तिरंग्याचा जन्म २२ जुलै १९४७ रोजी झाला.
- १५ ऑगस्ट १९४७ रोजी सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी कौन्सिल हाऊस (सध्याचं संसद भवन) मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरूंनी स्वतंत्र भारताच्या तिरंग्याचे राष्ट्रध्वज म्हणून ध्वजारोहण केले. त्याचदिवशी दुपारी इंडिया गेटशेजारी असलेल्या प्रिन्स पार्कमध्ये असलेल्या युद्ध स्मारकाजवळ झेंड्याचे सार्वजनिक ध्वजारोहण करण्यात आले.
- लाल किल्ल्याच्या बुरूजावर १५ ऑगस्ट १९४७ रोजी तिरंग्याचे सर्वप्रथम ध्वजारोहण करण्यात आले, असे सामान्यपणे मानले जाते. पण ते खरे नाही. वास्तविक पंडीत जवाहरलाल नेहरूंनी शनिवारी १६ ऑगस्ट १९४७ रोजी, सकाळी ८.३० वाजता लाल किल्ल्यावर पहिल्यांदा तिरंगा फडकवला. १५ ऑगस्टच्या पहिल्या-वहिल्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आणि इतर राष्ट्रीय नेते राज्यातील अनेक महत्त्वाच्या कार्यक्रमांत उपस्थित राहण्यात व्यस्त होते.
- देशात एकाच इमारतीत तीन तिरंगे एकत्रित फडकतात. संसदभवनात लोकसभेचे अध्यक्ष, राज्यसभेचे सभापती आणि लोकसभेचे उपसभापती असतात. हे तीन झेंडे या व्यक्तींकडे असणाऱ्या मोठ्या अधिकाराला अधोरेखित करतात.
- २९ मे १९५३ रोजी माऊंट एव्हरेस्टवर युनियन जॅक आणि नेपाळी राष्ट्रध्वजासोबत तिरंगा फडकवला. आपला तिरंगा जगातल्या सर्वोच्च शिखरावर पंधरा वेळा फडकवण्यात आला. या शिखरावर इतक्यावेळा अन्य कोणताही ध्वज फडकवलेला नाही. हा गौरव केवळ आपल्या तिरंग्याला प्राप्त झाला आहे.
- १९७४ साली पहिल्यांदा भारतीय तिरंग्याने अपोलो १५ मधून अवकाश सफर केली.
- १ जानेवारी १९८२ रोजी पहिल्या भारतीय अंटार्टीका दौऱ्यादरम्यान तिरंगा दक्षिण गंगोत्री येथे फडकवण्यात आला.
- १७ जानेवारी १९८३ रोजी कर्नल जे. के. बजाज यांनी दक्षिण ध्रुवावर सर्वप्रथम तिरंग्याचे ध्वजारोहण केले.
- २१ एप्रिल १९९६ रोजी रात्री ३:५५ मिनीटांनी (भारतीय वेळेनुसार) स्क्वाड्रन लीडर (सध्या विंग कमांडर) संजय थापर यांनी पहिल्यांदा उत्तर ध्रुवावर झेंडा फडकवला.

# सुधारीत ध्वज नियमावली - भारत

## (२००२, २००३ आणि २००५)

देशाचा राष्ट्रध्वज पवित्र ऐवजाप्रमाणे असतो. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा आदर करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. राष्ट्राच्या या पवित्र प्रतिकाप्रती सम्मान जाहीर करण्याच्या उद्देशाने प्रत्येकाला झेंड्याशी संबंधित नियमांची माहिती असायला हवी, त्याचप्रमाणे ध्वजाशी संबंधित संहिता तसेच रितीभाती आणि शिष्टाचार माहीत असले पाहिजेत. आपल्याला याविषयी माहिती असावी आणि सर्वसाधारण मार्गदर्शनासाठी भारताची सुधारित ध्वज नियमावली खाली विषद केली आहे.



*चित्र ५७ : ध्वजारोहण*

भारतीय राष्ट्रध्वज देशाच्या जनतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधीत्व करतो. ते आपल्या राष्ट्राभिमानाचे चिन्ह आहे. सहा दशकांहून अधिक काळ आपल्या सशस्त्र दलांबरोबर कित्येक जणांनी या तिरंग्याची शान टिकून राहावी, म्हणून स्वेच्छेने प्राण पणाला लावले आहेत.

राष्ट्रध्वजाचा आदर करणे, त्याच्याप्रती प्रामाणिक राहणे हे वैश्विक सत्य आहे. परंतु, अनवधनाने जागरूकतेची उणीव अनेकदा दिसते. केवळ नागरिकांमध्येच नव्हे तर सरकारी आस्थापने / संस्थामध्येही या जाणीवेचा अभाव दिसतो. राष्ट्रध्वजाचे संचलन करताना आखून दिलेले कायदे, पद्धती आणि संकेत योग्यरित्या पाळले जात नाहीत.

राष्ट्रध्वजाचे संचलन करताना पाळल्या जाव्या अशा सूचना वेळोवेळी सरकारकडून जारी होत असतात. राष्ट्रध्वजाचे प्रदर्शन, संप्रतीक आणि नाव (अनुचित प्रयोगाचे निवारण) अधिनियम, १९५० (१९५० कायदा क्र. १२) (राष्ट्रीय मानचिन्हे अवमान प्रतिबंधक कायदा १९७१ क्र. ६९) भारतीय राष्ट्रध्वज अधिनियम - २००२च्या अखत्यारीत या सगळ्या पद्धती, संकेत, कायदे आणि मार्गदर्शक तत्त्वे यांचा समावेश करण्यात आला आहे.

नागरिकांची सोय लक्षात घेता भारतीय राष्ट्रध्वज नियमावली - २००२ चे तीन भागात विभाजन करण्यात आले आहे. नियमावलीच्या पहिल्या भागात राष्ट्रध्वजाचे सर्वसाधारण वर्णन देण्यात आले आहे. सार्वजनिक, खाजगी आस्थापने, संस्थांचे सदस्य, शैक्षणिक संस्थांसाठी राष्ट्रध्वजाचे संचलन कसे करावे याबद्दलची माहिती नियमावलीच्या दुसऱ्या भागात देण्यात आली आहे. त्यानंतर तिसरा भाग केंद्र आणि राज्य सरकार तसेच त्यांच्या आस्थापने, संस्थांनी राष्ट्रध्वजारोहण करावे याबाबतचा आहे.

भारतीय ध्वज संहिता, २००२, दिनांक २६ जानेवारी, २००२ पासून प्रभावित झाली आणि ही 'ध्वज संहिता भारता'च्या वर्तमान स्वरूपात मार्गक्रमित झालेली आहे. परंतु २००३ व २००५ मध्ये यात काही आणखी सुधारणा केल्या गेल्या आहेत, जेणेकरून राष्ट्रध्वजाचा वापर आणखी सोप्या रितीने केला जाऊ शकेल.

# भाग-I

## सर्वसाधारण

१.१ राष्ट्रध्वज म्हणजे तीन रंगांच्या आयतांनी किंवा तीन समान रुंदीच्या आयतांनी बनलेला तिरंगी आयत. या तीन रंगांतील वरचा रंग म्हणजे भगवा किंवा केशरी. या तीन पट्ट्यांतील खालचा रंग गडद हिरवा असावा. मधला रंग शुभ्र पांढरा आणि त्यावर मध्यभागी गडद निळ्या रंगाच्या अशोक चक्राचे आरेखन असावे. या चक्रात त्याच रंगाचे चोवीस आरे असायला हवे. अशोकचक्र स्क्रीन प्रिटींगच्या माध्यमातून उमटलेले असले पाहिजे. ध्वजाच्या मधल्या शुभ्र पट्ट्यात दोन्ही बाजूला मध्यभागी ते अन्य माध्यमातून छापलेले किंवा स्टेन्सिल केलेले असावे. हे चक्र भरतकाम केलेले (एम्ब्रोयडरी) असले तरी चालते.

१.२ भारताचा राष्ट्रध्वज हा हातचरख्याने बनलेला असावा. हात चरख्याचे रेशीम/सुती/तलम खादीचे कापड असावे.

१.३ राष्ट्रध्वज हा आकाराने आयताकृती असला पाहिजे. ध्वजाच्या लांबी : रुंदीचे गुणोत्तर ३:२ असे असावे.

१.४ राष्ट्रध्वजाचा प्रमाणभूत आकार पान क्रमांक ७० वर दिलेल्या आकारानुसार असावा.

१.५ ध्वज संचलनासाठी योग्य आकार निवडावा. अतिमहत्त्वाच्या विमानांना ४५० बाय ३०० मिमी, मोटारगाड्यांसाठी २२५ बाय १५० मिमी तर टेबलावरच्या झेंड्याकरता १५० बाय १०० मिमी आकाराचा झेंडा सुचवण्यात आला आहे.

# आपल्या राष्ट्रीय झेंड्याचे प्रमाणभूत आकार

| झेंडा क्र. | परिमाण फूटात/इंच | मि.मी. मध्ये | सर्वसाधारणपणे वापरण्यात येतात |
|---|---|---|---|
| १ | २१'x१४' | ६३००x४२०० | उंच आणि मोठ्या ध्वजकाठीवर |
| २ | १२'x८' | ३६००x२४०० | लाल किल्ला, दिल्ली; राष्ट्रपती भवन, तोफांवर |
| ३ | ९'x६' | २७००x१८०० | संसद भवन आणि अन्य मध्यम आकाराच्या सरकारी इमारतींवर |
| ४ | ६'x४' | १८००x१२०० | लहान आकाराच्या सरकारी इमारतींवर आणि राज्य तसेच लष्करी दुखवट्याप्रसंगी |
| ५ | ५'.५"x३' | ३५०x९०० | छोट्या आकाराच्या सरकारी भवनांवर व इमारतींवर |
| ६ | ३'x२' | ९००x६०० | तिरक्या बारवर आणि एखाद्या खोलीच्या भिंतीवर |
| ७ | १८"x१२" | ४५०x३०० | अतिमहत्त्वपूर्ण व्यक्तींच्या विमानांवर आणि राष्ट्रपतींच्या ट्रेनवर |
| ८ | ९"x६" | २२५x१५० | अतिमहत्त्वपूर्ण व्यक्तींच्या मोटारींवर |
| ९ | ६"x४" | १५०x१०० | टेबलावरच्या झेंड्यासाठी |

# भाग-II

## सर्वसामान्य जनता / खासगी संघटनांच्या आणि शैक्षणिक संस्थेच्या सदस्यांनी राष्ट्रध्वज कसा वापरावा

### कलम I

२.१ सर्वसामान्य जनता, खासगी आस्थापनांच्या आणि शैक्षणिक संस्थांच्या सदस्यांनी राष्ट्रध्वज कसा फडकवावा याबाबत मानचिन्हे आणि नाव (चुकीच्या वापरावर प्रतिबंध) कायदा १९५० आणि राष्ट्रीय मानचिन्हे अपमान प्रतिबंधक कायदा १९७१ अन्वये दिलेली व्याप्ती वगळून; कोणतेही निर्बंध नसतात.


(i) मानचिन्हे आणि नाव (चुकीच्या वापरावर प्रतिबंध) कायदा १९५० चा भंग करत राष्ट्रध्वज व्यापारी कारणास्तव न वापरणे;

(ii) एखाद्या व्यक्ती किंवा वस्तूला सलामी देण्यासाठी झेंडा न झुकवणे;

(iii) झेंडा अर्ध्यावर न फडकवणे. काही प्रसंगी सरकारने जारी केलेल्या सूचनांवर सार्वजनिक इमारतींवर तो अर्ध्यावर फडकवता येतो;

(iv) राष्ट्रध्वजाचा वस्तू किंवा आवरणासारखा वापर करू नये, खासगी अंत्यविधीही समाविष्ट;

(v) राष्ट्रध्वजाचा पोशाख किंवा पेहरावाकरता वापर करू नये. उशी, हातरुमाल, नॅपकीन किंवा अन्य वस्त्रांवर झेंडा छापता अगर विणता येत नव्हता, पण ५ जुलै २००५ रोजी केंद्रीय




*चित्र ५८ : खांबावर उंच फडकणारा झेंडा*

मंत्रिमंडळाने ध्वज नियमावलीत (फ्लॅग कोड) बदल करण्याचा निर्णय घेतला गेला. ६ डिसेंबर २००५ रोजी या बदलाकरता संसदेत विधेयक संमत केले. या सुधारणेनुसार राष्ट्रध्वज आपल्या पोशाख, पेहराव आणि स्पोर्टस गिअरचा भाग बनू शकतो. परंतु, आजही झेंडा अंतर्वस्त्रावर वापरता येत नाही. पेहरावाची जोडवस्तू (असेसरी) किंवा कमरेखालच्या पोशाखाचा भाग बनू शकत नाही; त्याला तक्के, रुमाल, नॅपकीन किंवा अन्य पोशाखावर विणून किंवा छापून वापरता येते;


(vi) राष्ट्रध्वजावर कोणत्याही प्रकारची अक्षरे उमटवता येत नाहीत;

(vii) राष्ट्रध्वजाचा वापर पात्रासारखा होऊ शकत नाही. त्याचा काही घेण्यासाठी, देण्यासाठी, ठेवण्याकरता वापर होऊ शकत नाही. काही विशिष्ट प्रसंगी फुलांच्या पाकळ्या झेंड्यात गुंडाळता येतात. प्रामुख्याने स्वातंत्र्यदिनी आणि प्रजासत्ताक दिनाला;

(viii) पुतळ्याचे अनावरण करताना ध्वजाचा वापर भिन्न पद्धतीने करावा, एखाद्या पुतळा/स्मारकाला आच्छादण्याकरता ध्वज वापरू नये;



*चित्र ५९ : आडव्या ध्वजस्तंभावर फडकणारा झेंडा*



*चित्र ६० : उपमार्गाच्या वर दोरीवर लटकलेला भारताचा राष्ट्रध्वज*

(ix) वक्त्याचे टेबल आच्छादण्यासाठी ध्वज वापरू नये. तसेच व्यासपीठावरही असा वापर टाळावा;

(x) ध्वज जाणीवपूर्वक जमिनीवर, फरशीवर पडणार नाही किंवा पाण्यात भिजणार नाही याची काळजी घ्यावी;

(xi) एखादे वाहन, ट्रेन, नौका किंवा विमानाच्या बाजूंना किंवा छतावर झेंड्याचा वापर करू नये;

(xii) इमारतीच्या आच्छादना-साठी झेंडा वापरू नये; आणि

(xiii) केशरी रंग खालच्या बाजूला ठेवून ध्वजारोहण करू नये.

२.२ खासगी, सार्वजनिक संघटना किंवा शैक्षणिक संस्थांचे सदस्य नेहमी, आणि काही खास प्रसंगी, कार्यक्रमांना किंवा सहज राष्ट्रध्वजापोटी आदर आणि मान व्यक्त करण्यासाठी तो फडकवू शकतात.

(i) जेव्हा राष्ट्रध्वज फडकवण्यात येतो तेव्हा तो आदरभावाने आणि विशिष्ट पद्धतीने फडकवला गेला पाहिजे;

(ii) फाटलेला किंवा विस्कळीत झालेला झेंडा फडकवू नये;

(iii) राष्ट्रध्वजाच्या खांबावर एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक झेंडे फडकवू नयेत;

(iv) या नियमावलीच्या कलम IX च्या विभाग II प्रमाणे केलेल्या तरतुदीनुसार त्यात नमूद केलेल्या वाहनांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही वाहनांवर ध्वज फडकवणे निषिद्ध आहे;

(v) जेव्हा वक्त्याच्या व्यासपीठावर ध्वज फडकवण्यात येतो तेव्हा वक्ता श्रोत्यांकडे चेहरा करून बोलत असताना त्याच्या उजव्या बाजूला असावा किंवा भिंतीला लागून, वक्त्याच्या वर आणि मागच्या बाजूला असावा;

(vi) जेव्हा झेंडा भिंतीच्या समांतर आणि आडवा फडकवण्यात येतो तेव्हा केशरी रंग वरच्या बाजूला असावा. जेव्हा तो उभा फडकवण्यात येतो तेव्हा केशरी पट्टा झेंड्याच्या उजव्या बाजूला असावा असा संकेत आहे (म्हणते झेंड्याकडे चेहरा करून उभ्या राहिलेल्या व्यक्तीच्या उजव्या बाजूला);

(vii) शक्यतो निर्धारीत आकाराचे ध्वजच प्रदर्शित केले जावेत आणि शक्यतो झेंड्याच्या लांबी आणि रुंदीचे प्रमाण ३:२ असावे;

(viii) अन्य कोणताही झेंडा किंवा पताका राष्ट्रध्वजापेक्षा उंच, वर किंवा दुतर्फा असू नये; फुले किंवा हार किंवा चिन्ह तत्सम घटक ध्वज ज्या खांबावर फडकतो त्यावर असू नये;

(ix) कोणत्याही प्रकारच्या सजावटीकरता पताका, रिबन फूल किंवा निशाण म्हणून राष्ट्रध्वजाचा वापर करू नये;

(x) राष्ट्रीय, सांस्कृतिक आणि महत्त्वाच्या क्रीडा कार्यक्रमांत कागदी ध्वजाचा वापर नागरीक करू शकतात. परंतु, हे कागदी झेंडे कार्यक्रम संपल्यानंतर जमिनीवर टाकून जाऊ नयेत; होता होईल तो या झेंड्यांची खासगीत आदर ठेवून विल्हेवाट लावावी;

(xi) जेव्हा राष्ट्रध्वज उघड्या जागी फडकत असेल तेव्हा योग्य ते हवामान लक्षात घेऊन तो जास्तीत-जास्त सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत फडकत ठेवावा;

(xii) जर झेंडा फाटला असेल तर तो चिकटवून, त्याची डागडुजी करून फडकवू नये; आणि

(xiii) जेव्हा झेंडा क्षतीग्रस्त होतो तेव्हा तो खासगीत योग्य ती प्रतिष्ठा राखून जाळला जावा किंवा झेंड्याची प्रतिष्ठा लक्षात घेऊन इतर पद्धतीने अशा झेंड्याची विल्हेवाट लावावी.

# कलम II

२.३ ध्वजाप्रती आदराविषयी प्रोत्साहन मिळावे म्हणून राष्ट्रध्वज शैक्षणिक संस्थांवर फडकवण्यात येतो (शाळा, महाविद्यालये, क्रीडा शिबिरे, स्काऊट शिबिरे इत्यादी) यासाठी मार्गदर्शन व्हावे म्हणून काही सूचना पुढे दिल्या आहेत :

(i) शाळेच्या आवारात चौकोनात विद्यार्थी उभे राहतात. तीन रांगेत विद्यार्थी तर ध्वजाच्या समोर चेहरा येईल अशा पद्धतीने ध्वज कर्मचारी उभे राहतात. प्राचार्य हे विद्यार्थ्यांचे प्रमुख असतात. जर प्राचार्यांव्यतिरिक्त एखादी व्यक्ती ध्वजारोहण करणार असेल तर ती ध्वज कर्मचाऱ्यांच्या पाठीमागे तीन हात सोडून उभी राहते;

(ii) विद्यार्थी त्यांच्या वर्गानुसार एकत्र करावेत. त्यांना दहा-दहाच्या गटात वाटून घ्यावे (किंवा त्यांच्या संख्येनुसार गट करावेत) विद्यार्थ्यांच्या प्रमुखाने आपल्या वर्गाच्या पहिल्या रांगेच्या उजव्या बाजूला उभे राहावे. त्याचबरोबर विद्यार्थी गटप्रमुखाने त्यांच्या वर्गाच्या पाठीमागे शेवटच्या रांगेत, मध्यभागी उभे राहावे. वरिष्ठतेच्या निकषानुसार वर्गाने चौकट तयार करावी. सर्वात वरिष्ठ व्यक्तीने वर्गाच्या उजवीकडे शेवटी उभे राहावे;

(iii) प्रत्येक रांगेत सुयोग्य जागा असावी. साधारण तीस इंचाची जागा सोडावी. प्रत्येक गटात साधारण एवढीच जागा सोडावी;

(iv) जेव्हा एखादा गट किंवा वर्ग तयार होतो तेव्हा वर्गप्रमुख पुढे येतो आणि विद्यार्थी गटप्रमुखाला सलाम ठोकतो. जेव्हा सगळे गट सज्ज होतात तेव्हा शाळेचा वर्गप्रमुख पुढे येऊन शाळेच्या प्राचार्यांना सलामी देतो. नंतर शाळेचे प्राचार्यसुद्धा विद्यार्थी प्रमुखाला सलाम करतात. मग झेंडावंदनाचा कार्यक्रम सुरू होतो. त्यासाठी शाळा वर्गप्रमुख मदत करू शकतो;

(v) शाळेचा विद्यार्थी प्रमुख किंवा संपूर्ण परेड (सभा) झेंडावंदनापूर्वी सर्वांचे लक्ष वेधतो. जेव्हा झेंडा फडकेल तेव्हा सर्वांनी त्याला सलामी द्यावी असेही सांगतो. झेंडा फडकल्यानंतर परेड काही क्षण सलामीच्या स्थितीत राहते. 'ऑर्डर' मिळेपर्यंत परेड या स्थितीत असते.

(vi) राष्ट्रगीत संपल्यानंतरही पुन्हा एकदा ध्वज सलामी देण्यात येते. या कार्यक्रमाच्या वेळी संपूर्ण परेडने झेंड्याकडे आणि सूचनांकडे लक्ष दिले पाहिजे;

(vii) प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी जेव्हा प्रतिज्ञा घेतली जाते तेव्हा राष्ट्रगीतही सादर केले जावे. जेव्हा प्रतिज्ञा घेतली जाते तेव्हा सभेने सावधान अवस्थेत असले पाहिजे. प्राचार्यांकरवी प्रतिज्ञा दिली जावी आणि जमावाने ती त्यांच्यामागून म्हणावी;

(viii) प्रतिज्ञेत राष्ट्रध्वजापोटी निष्ठा प्रतीत होत असल्याने शाळेने खालीलप्रमाणे तिचे पालन करावे :

## ध्वज शपथ



*"मी..., राष्ट्रध्वज आणि त्याच्या सार्वभौम धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताकाच्या प्रती निष्ठेची शपथ घेतो/घेते ज्याचा हा झेंडा प्रतीक आहे."*

# भाग-III

## (ध्वजारोहण/संचलनाप्रसंगी केंद्र आणि राज्य सरकार आणि त्यांच्या संटना, शैक्षणिक संस्थेच्या सदस्यांनी राष्ट्रध्वज कसा वापरावा)

### कलम I

### सुरक्षा प्रतिष्ठान/शिष्टमंडळ/पद प्रमुख

३.१ या भागात दिलेल्या तरतुदी सुरक्षा अशा प्रतिष्ठानासाठी आहेत, ज्यांचे ध्वजारोहणाकरता स्वतःचे स्वतंत्र नियम आहेत.

३.२ परदेशात असलेले आपले शिष्टमंडळ/पद प्रमुखांच्या मुख्य कार्यालयांवर आणि निवासस्थानांवर राष्ट्रध्वज फडकवण्यात यावा. राजनैतिक आणि सल्लागार प्रतिनिधींनी मुख्य कार्यालयावर आणि त्यांच्या अधिकृत निवासस्थानी त्यांचे राष्ट्रध्वज फडकवावे, अशी प्रथा आहे.

### कलम II

### अधिकृत ध्वजारोहण

३.३ वर दिलेल्या कलम I मधल्या तरतुदींच्या विषयी सर्व सरकारी आणि त्यांच्या संघटना आणि संस्थांनी या भागात दिलेल्या तरतुदींचे पालन केले पाहिजे.

३.४ सर्व कार्यक्रमात अधिकृत ध्वजारोहण हे भारतीय प्रमाण विभागाने नमूद केलेल्या तपशीलानुसार असावे. अन्य कार्यक्रमांप्रसंगीही सुयोग्य आकारातील झेंड्यांचे संचलन करण्यात यावे. परंतु, सामान्य जनतेने असे झेंडे वापरावे, हे अनिवार्य नाही. भारतीय प्रमाण विभागाने आखून दिलेल्या तपशिलापेक्षा ते भिन्न असू शकतात.

## कलम III

### योग्य ध्वजारोहण पद्धती

३.५ जेव्हा झेंडा फडकवण्यात येतो, तेव्हा सन्मानपूर्वक आणि नीट म्हणजे नजर जाईल अशा ठिकाणी फडकवला गेला पाहिजे.

३.६ जेव्हा झेंडा सार्वजनिक इमारतींवर फडकवण्यात येतो तेव्हा तो सर्व दिवशी फडकवला गेला पाहिजे. रविवार आणि अन्य सुट्टीच्या दिवशीही. या नियमावलीत दिल्याप्रमाणे सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, कोणत्याही हवामानात तो फडकवला जावा. काही विशेष प्रसंगी रात्रीच्या वेळीही झेंडा फडकवला जाऊ शकतो.

३.७ जेव्हा ध्वजारोहण होते तेव्हा झेंडा खांबावर चपळतेने झटपट चढवावा. तसेच तो हळूवार उतरवावा. जेव्हा ध्वजारोहण किंवा ध्वजावतरण होत असते तेव्हा योग्य बिगुल वादनाच्या पार्श्वभूमीवर ते झाले पाहिजे. बिगुल वादन आणि झेंडा चढवणे-उतरवण्यात समान गती असली पाहिजे.

३.८ जेव्हा ध्वजारोहण खांबावर केले जाते तेव्हा खिडकी, गच्चीच्या कोपऱ्यांपासून दूर असावा. जेव्हा तो इमारतीसमोर फडकवला जातो तेव्हा ध्वजकाठीवर केशरी रंग वरच्या दिशेल असावा.

३.९ जेव्हा झेंडा भिंतीवर समांतर किंवा आडवा फडकवण्यात येतो तेव्हा केशरी रंग वरच्या बाजूला असावा. ज्यावेळी तो उभ्या पद्धतीने फडकवला जातो त्यावेळी केशरी रंग झेंड्याच्या डाव्या बाजूला यावा. याचा अर्थ व्यक्ती झेंड्याकडे चेहरा करून उभी राहिली तर झेंड्याची फडकणारी टोकं त्याच्या उजवीकडे असावीत.

३.१० ज्यावेळी झेंडा वक्त्याच्या व्यासपीठावर झळकवण्यात येतो तेव्हा तो वक्त्याच्या उजवीकडून फडकवलेला असावा. वक्त्याचा चेहरा श्रोत्यांच्या दिशेने असतो तेव्हा झेंडा भिंतीला समांतर असावा. वक्त्याच्या पाठीमागे आणि त्याच्या वर असावा.



चित्र ६१ : अन्य झेंड्यांबरोबरच्या ध्वजसंचलनात तिरंगा उजवीकडे असावा



चित्र ६२ : ध्वजसंचलनात तिरंगा मुख्य रांगेच्या पुढे असावा

३.११ ज्यावेळी पुतळ्याचे अनावरण आणि तत्सम कार्यक्रम असतात तेव्हा झेंडा वेगळ्यापद्धतीने आणि स्वतंत्र फडकवावा.

३.१२ जेव्हा मोटारीवर झेंडा फडकवला जातो तेव्हा तो छोट्या ध्वजास्तंभावर फडकवण्यात यावा. तो स्तंभ मोटारीच्या बोनेटवर मध्यभागी घट्ट केलेला असावा किंवा मोटारीच्या उजवीकडे असावा.

३.१३ जेव्हा झेंडा एखाद्या मिरवणुकीत किंवा संचलनात नेण्यात येतो तेव्हा तो उजव्या बाजूने नेला जावा.

याचा अर्थ झेंड्याच्या उजव्या बाजूने किंवा अन्य झेंड्यांच्या रांगेच्या उजवीकडून मधल्या रांगेच्या पुढे असावा.

## कलम IV

### झेंड्याचे अयोग्य ध्वजारोहण

३.१४ खराब झालेला किंवा फाटक्या-तुटक्या अवस्थेतला झेंडा फडकवू नये.

३.१५ कोणत्याही व्यक्तीच्या सन्मानार्थ राष्ट्रध्वज नाचवू नये, झुकवू नये.

३.१६ राष्ट्रध्वजापेक्षा उंच किंवा अशापद्धतीने अन्य कोणताही झेंडा किंवा पताका नसावी. त्यावर फुले, हार, चिन्ह नसावी. राष्ट्रध्वजाच्या ध्वजकाठीवर/खांबापेक्षा उंच अन्य कोणताही घटक नसावा.

३.१७ सजावटीकरता राष्ट्रध्वजाची पताका, प्लास्टीक फुले किंवा हार बनवू नये.

३.१८ वक्त्याचे टेबल झाकण्यासाठी किंवा व्यासपीठावर आच्छादन म्हणून राष्ट्रध्वजाचा वापर करू नये.

३.१९ 'केशरी' रंगाचा पट्टा खाली येईल अशा पद्धतीने झेंडा फडकवू नये.

३.२० राष्ट्रध्वज जमिनीला किंवा लादीला टेकू देऊ नये अगर पाण्यात सोडू नये.

३.२१ जर राष्ट्रध्वज फाटला असेल किंवा त्याला हानी पोहचली असेल तर त्याची डागडुजी करून तो फडकवू नये.

## कलम V

### झेंड्याचा दुरुपयोग

३.२२ झेंड्याचा वेष्टनासारखा उपयोग करू नये. अपवाद राज्य/लष्करी/केंद्रीय निमलष्करी दलाशी संबंधित अंत्यविधी.

३.२३ कोणत्याही वाहनाच्या ट्रेन किंवा बोटीवर, छताला आणि बाजूला किंवा मागे झेंड्याचा आच्छादन म्हणून वापर करू नये.

३.२४ झेंडा खराब होईल किंवा त्याला नुकसान पोहोचले अशा रितीने त्याचा वापर करू नये किंवा त्याला अशा तऱ्हेने ठेवू नये.

३.२५ जेव्हा झेंडा खराब होतो किंवा त्याला हानी पोहोचते तेव्हा त्याचा अनादर होईल अशा तऱ्हेने तो नष्ट करू नये. तो अत्यंत खासगी रितीने नष्ट करावा. त्याचे आदरपूर्वक पद्धतीने दहन किंवा दफन करावे.

३.२६ कोणत्याही इमारतीला आच्छादन म्हणून झेंड्याचा उपयोग करू नये.

३.२७ कमरेखालच्या कपड्याचा भाग म्हणून झेंड्याचा पोशाखात वापर करू नये. उशी - तक्के, रुमाल, नॅपकीन किंवा खोक्यावर झेंड्यासारखे नक्षीकाम करू नये तसेच त्याचे मुद्रण टाळावे. *(६ डिसेंबर २००५ रोजी हे कलम पुनर्गठीत करण्यात आले) आता कमरेच्या वर कपड्यांवर झेंड्याच्या प्रतिकृतीचे रेखांकन करता येते.*

३.२८ झेंड्यावर कोणत्याही स्वरूपाची अक्षरं लिहिलेली अगर मुद्रण केलेली असू नयेत.

३.२९ राष्ट्रध्वजाचा वापर कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीत करू नये. ज्या स्तंभावर झेंडा फडकण्यात आला आहे त्यावर कुठलीही जाहिरात चिकटवू नये.

३.३० कोणतीही वस्तू घेताना, देताना, स्वतःसोबत ठेवताना किंवा नेताना झेंड्याचा पिशवीसारखा वापर टाळावा. स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिवस यांसारख्या राष्ट्रीय दिनाच्या किंवा तत्सम विशेष दिवशी जल्लोषासाठी ध्वजारोहण होण्याआधी झेंड्यात फुलं ठेवल्यास चालते.

## कलम VI

### सलामी


३.३१ राष्ट्रध्वज फडकवताना किंवा त्याचे ध्वजावतरण करताना किंवा संचालनात ध्वज नेताना सगळ्यांनी झेंड्याकडे तोंड करून सावधान स्थितीत उभे राहावे. जे विशेष पोशाखात असतात त्यांनी योग्य पद्धतीने सलामी ठोकणे आवश्यक असते. जेव्हा झेंडा एका रांगेतून दुसऱ्या रांगेत फिरवायचा असतो तेव्हा इतरांनी स्तब्ध उभे राहावे किंवा जेव्हा त्यांच्यासमोर झेंडा येईल तेव्हा त्याला सलामी दिली पाहिजे. विशेष व्यक्तींच्या डोक्यावर फेटा, टोपी नसली तरी ते सलामी देऊ शकतात.

## कलम VII

## संयुक्त राष्ट्रसंघ आणि अन्य राष्ट्रांच्या ध्वजासोबतची मांडणी

३.३२ जेव्हा इतर देशांच्या झेंड्यांबरोबर सरळ रेषेत राष्ट्रध्वज झळकवला जातो तेव्हा सगळ्या झेंड्यांच्या उजवीकडे त्याची मांडणी असायला हवी. उदाहरणार्थ, झेंड्यांच्या रांगेत जर निरीक्षक प्रेक्षकांकडे तोंड करून उभा असेल तर राष्ट्रध्वज त्याच्या उजव्या बाजूला असला पाहिजे.

३.३३ परराष्ट्राचे ध्वज हे देशांच्या इंग्रजी नावाच्या आवृत्तीनुसार आद्याक्षरांच्या वर्णक्रमाने एका ओळीत फडकवण्यात येतात. राष्ट्रध्वज रांगेत सुरुवातीला किंवा शेवटी असण्याला परवानगी असते. जर एखादा देश इंग्रजी अक्षराच्या आद्याक्षराच्या




*चित्र ६३ : परदेशी राष्ट्रांच्या झेंड्यांसोबत आपला राष्ट्रध्वज. अगदी डाव्या बाजूला फडकलेला राष्ट्रध्वज*

क्रमाने ओळीत राष्ट्रध्वज फडकवत असल्यास ते ग्राह्य मानले जावे. सुरुवातीला त्या देशाच्या राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात यावे आणि सर्वात शेवटी ध्वजावतरण झाले पाहिजे.

३.३४ जर राष्ट्रध्वज उघड्या मैदानावर वर्तुळात किंवा अर्धवर्तुळाकार फडकवण्यात येणार असेल, उदाहरणार्थ कमान किंवा वर्तुळाकार पद्धतीत तरी या कलमाच्या पोटकलमात नमूद केलेल्या पद्धतीचा अवलंब करावा. जेव्हा झेंडे अशा तऱ्हेने एका बंधात फडकवले जातात तेव्हा पूर्ण वर्तुळात सुरुवातीला राष्ट्रध्वज फडकवण्यात यावा. त्यानंतर अन्य देशांचे झेंडे गोल घड्याळाच्या मांडणीप्रमाणे, शेवटचा झेंडा हा राष्ट्रध्वजाच्या बाजूला येईल अशा रितीने असावेत. वर्तुळाची सुरुवात किंवा शेवट दर्शवण्यासाठी आणखी एका वेगळ्या झेंड्याच्या मांडणीची आवश्यकता नाही. वर्तुळाकार मांडणीतही राष्ट्रध्वजाची मांडणी इंग्रजी वर्णक्रमानुसार असायला हवी.

३.३५ जेव्हा राष्ट्रध्वज दुसऱ्या ध्वजाबरोबर ध्वजकाठीसोबत गुणाकाराच्या चिन्हाप्रमाणे भिंतीवर लावण्यात येतात तेव्हा राष्ट्रध्वज हा उजव्या बाजूला असायला हवा. उदाहरणार्थ, झेंड्याच्या उजव्या बाजूला. दोन्ही ध्वजाच्या काठ्या एकमेकांविरुद्ध असायला हव्या.



*चित्र ६४ : दुसऱ्या ध्वजाबरोबर भितींवरचा राष्ट्रध्वज. ध्वजकाठ्या गुणाकार चिन्हाप्रमाणे असून तिरंगा स्वतःच्या उजवीकडे दिसत असून त्याची ध्वजकाठी दुसऱ्या ध्वजकाठीवर आहे.*



*चित्र ६५ : संयुक्त राष्ट्रसंघाच्या झेंड्यासोबत भारताचा राष्ट्रध्वज*

३.३६ जेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाचा झेंडा एखाद्या राष्ट्रध्वजासोबत फडकवण्यात येणार असेल तेव्हा तो राष्ट्रध्वजाच्या बाजूनेच फडकवला गेला पाहिजे. राष्ट्रध्वजाची दिशा त्याच्या उजव्या बाजूला असणे गरजेचे आहे. याचा अर्थ त्याला सलामी देणाऱ्याच्या डाव्या बाजूच्या टोकाला त्याचे फडकणे असले पाहिजे. झेंड्याची मांडणी वरील आकृतीत दाखवली आहे.

३.३७ जेव्हा राष्ट्रध्वज अन्य देशाच्या झेंड्याबरोबर फडकणार असतो त्यावेळी दोन्ही झेंड्यांचे आकार समान असायला हवेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतीसमयी राष्ट्रध्वजावर इतर देशाच्या झेंड्याच्या प्रदर्शनास मज्जाव आहे.

३.३८ एकाच ध्वजस्तंभावरून राष्ट्रध्वजाव्यतिरिक्त अन्य झेंडा अगर झेंडे फडकवू नयेत. वेगळ्या झेंड्यांकरता स्वतंत्र स्तंभ असायला हवेत.

# कलम VIII

## सार्वजनिक इमारतींवर/अधिकृत सरकारी निवासांवर झेंड्याची मांडणी

३.३९ साधारणपणे राष्ट्रध्वज हा उच्च न्यायालये, मंत्रालये, आयुक्तालये, तहसील कार्यालये, कारागृहे तसेच जिल्हा मंडळे, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा आणि विभागीय/सार्वजनिक क्षेत्र कार्यालयांवर फडकवला जातो.

३.४० देशाच्या सीमाभागात राष्ट्रध्वज हा चौकी, सरहद्द तळावर आऊटपोस्ट तपासणी नाक्यांवर (चेक पोस्ट) सीमा-शुल्क चौकी, आणि तत्सम महत्त्वाच्या ठिकाणांवर फडकत असतो. सीमाभागात जे गस्ती पथकांचे तंबू असतात, त्यांच्याबाहेरही राष्ट्रध्वज फडकत ठेवावा लागतो.

३.४१ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल आणि लेफ्टनंट पदाच्या अधिकाऱ्यांच्या अधिकृत निवासस्थानांवर ते उपस्थित असताना राष्ट्रध्वज फडकत असणे आवश्यक आहे. जेव्हा ते आपले निवासस्थान सोडून अन्य ठिकाणी भेटी द्यायला जातात त्याठिकाणी राष्ट्रध्वज असणे महत्त्वाचे ठरते. जेव्हा या महत्त्वाच्या व्यक्ती



*चित्र ६६ : आंतरराष्ट्रीय परिषदा, परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादी ठिकाणी समान आकाराच्या ध्वजस्तंभावर राष्ट्रध्वजांची मांडणी आढळते.*

निवासस्थान सोडून बाहेर जातात तेव्हा झेंडा त्वरीत उतरवला जावा. ते मुख्य दरवाज्यातून परत येताना दिसताच निवासात दाखल होण्यापूर्वी राष्ट्रध्वज पुन्हा फडकवला पाहिजे. जेव्हा महत्त्वाच्या व्यक्ती आपल्या मुख्यालयाबाहेर जातात तेव्हा ते ज्याठिकाणी निवास करणार आहेत त्या इमारतीवर राष्ट्रध्वज फडकवला जावा. ते या इमारतीत दाखल होण्यापूर्वी ध्वजारोहण करावे. त्याचप्रमाणे जागा सोडल्यावर राष्ट्रध्वज उतरवावा. अशा अधिकृत निवासस्थळी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत झेंडा फडकवावा. मात्र स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, महात्मा गांधी जयंती, राष्ट्रीय सप्ताह (६ ते १३ एप्रिल हा आठवडा जालियनवाला बाग हुतात्मा स्मृती सप्ताह म्हणून पाळला जातो) त्याप्रमाणे भारत सरकारने राष्ट्रानंद लक्षात घेऊन नेमलेले दिवस, राज्य स्थापना दिन अशा महत्त्वाच्या दिवशी माननीय व्यक्ती मुख्यालयात असो अथवा नसो राष्ट्रध्वज फडकत राहिला पाहिजे.

३.४२ जेव्हा राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा पंतप्रधान एखाद्या संस्थेला भेट देण्याकरता येतात तेव्हा त्या संस्थेवर या व्यक्तींप्रती आदर दाखवण्याकरता राष्ट्रध्वज फडकवला पाहिजे.

३.४२ परदेशी सन्माननीय व्यक्ती, उदाहरणार्थ, राष्ट्राध्यक्ष, उपराष्ट्रपती, सम्राट/राजा किंवा राज वारस आणि पंतप्रधान यांच्या भेटीदरम्यान त्यांच्या देशाच्या राष्ट्रध्वजासोबत आपला तिरंगा फडकण्यात यावा (कलम VII मध्ये नमूद केलेल्या नियमांनुसार) खासगी संस्थांनी परदेशी सन्माननीय व्यक्तींचा आदर म्हणून ही प्रथा पाळावी. ज्या सार्वजनिक इमारतींना ते भेट देणार त्याठिकाणी राष्ट्रध्वज फडकवला जावा.

## कलम IX

### मोटारींवर झेंड्याची मांडणी

३.४४ मोटारींवर राष्ट्रध्वज फडकवण्याचा मान मर्यादीत स्वरूपाचा आहे, तो असा :

१. राष्ट्रपती;

२. उपराष्ट्रपती;

३. राज्यपाल आणि उपराज्यपाल;

४. देशाचे परदेशातील मान्यताप्राप्त प्रमुख;

५. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळातील इतर मंत्री;

६. राज्यमंत्री आणि केंद्रातील नेते;

७. राज्य अथवा केंद्रशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि अन्य मंत्रिमंडळातील मंत्री;

८. राज्य अथवा केंद्रशासित राज्यांचे राज्यमंत्री आणि उपमंत्री;

९. लोकसभेचे अध्यक्ष;

१०. राज्यसभेचे उपाध्यक्ष;

११. लोकसभेचे उपाध्यक्ष;

१२. राज्यातील विधानपरिषदांचे अध्यक्ष;

१३. राज्यातील आणि केंद्रातील विधानसभांचे अध्यक्ष;

१४. राज्यातील विधानपरिषदांचे उपाध्यक्ष;

१५. राज्यातील आणि केंद्रातील विधानसभांचे उपाध्यक्ष;

१६. भारताचे मुख्य न्यायमूर्ती;

१७. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश;

१८. उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायमूर्ती; आणि

१९. उच्च न्यायालयांचे न्यायाधीश.

३.४५ परिच्छेद ३.४४ च्या कलम (५) ते (७) सन्माननीय व्यक्तींच्या मोटारींवर राष्ट्रध्वज मांडणीविषयीची माहिती नमूद केली आहे.

३.४६ जेव्हा परदेशी सन्माननीय व्यक्ती सरकारी मोटारींचा वापर करतील तेव्हा राष्ट्रध्वज हा मोटारीच्या उजवीकडे फडकला पाहिजे तर परदेशात तो मोटारीच्या डावीकडे असावा असा संकेत आहे.

## कलम X

### ट्रेन/विमानावरची राष्ट्रध्वजाची मांडणी

३.४७ जेव्हा राष्ट्रपती विशेष ट्रेनने देशांतर्गत प्रवास करत असतील तेव्हा चालकाने गाडी स्थानकातून निघताना फलाटाच्या दिशेने राष्ट्रध्वज फडकवला पाहिजे. जेव्हा विशेष ट्रेन स्थानकात उभी असेल किंवा येऊन थांबणार असेल तेव्हा राष्ट्रध्वज फडकवला जावा.

३.४८ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा पंतप्रधान यांच्या परदेश दौऱ्यादरम्यान राष्ट्रध्वज विमानावर फडकवण्यात आला पाहिजे. त्याचबरोबर ज्या देशाला या व्यक्ती भेट द्यायला निघाल्या आहेत, त्या देशाचा ध्वजही सोबत फडकवला पाहिजे. ज्यावेळी भेट द्यायला चाललेल्या देशाच्या हद्दीत प्रवेश करून विमानतळावर विमान उतरण्याआधी त्या देशाप्रती शिष्टाचार आणि सद्भावना दाखवण्यापोटी राष्ट्रध्वज फडकवला गेला पाहिजे.

३.४९ जेव्हा राष्ट्रपती देशात दौरा करतात तेव्हा ते विमानात ज्या बाजूने चढणार आणि उतरणार, त्या बाजूला राष्ट्रध्वज फडकवला पाहिजे.



*चित्र ६७ : विमानावरचा राष्ट्रध्वज*

## कलम XI

### झेंडा अर्ध्यावर उतरवणे

३.५० खाली दिलेल्या विशेष व्यक्तींच्या दुःखद निधनप्रसंगी दिलेल्या ठिकाणांवर असलेला राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवला पाहिजे :



*चित्र ६८ : ध्वजस्तंभावर अर्ध्यावर उतरवण्यात आलेला राष्ट्रध्वज*

| विशेष व्यक्ती | ठिकाण किंवा जागा |
|---|---|
| राष्ट्रपती<br>उपराष्ट्रपती<br>पंतप्रधान<br>लोकसभेचे अध्यक्ष<br>भारताचे मुख्य न्यायमूर्ती | संपूर्ण भारत |
| केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री<br>राज्यमंत्री किंवा केंद्रातील उपमंत्री<br>राज्यपाल | दिल्ली आणि राज्यांच्या राजधान्या |
| उपराज्यपाल<br>राज्याचे मुख्यमंत्री<br>केंद्रशासित राज्यांचे मुख्यमंत्री | संपूर्ण राज्यात आणि केंद्राच्या प्रांतात |
| एखाद्या राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री | संबंधित राज्याच्या राजधानीत |

३.५१ जर एखाद्या विशेष व्यक्तीच्या निधनाची बातमी दुपारच्या वेळी कळली तर लागलीच झेंडा अर्ध्यावर उतरवला गेला पाहिजे. वर नमूद केलेल्या जागांवरचे झेंडे त्वरीत अर्ध्यावर आणले गेले पाहिजेत. त्याचप्रमाणे अंत्यविधीची तयारी सूर्योदयानंतर झाली पाहिजे.

३.५२ ज्या दिवशी विशेष व्यक्तीच्या अंत्यविधीची तयारी होईल त्यादिवशीसुद्धा त्या ठिकाणी असलेला झेंडा अर्ध्यावर उतरवला जायला हवा.

३.५३ कोणत्याही विशेष व्यक्तीच्या निधनप्रसंगी राज्यात दुखवटा जाहीर करण्यात यावा. जर ती व्यक्ती केंद्राशी संबंधित असेल तर संपूर्ण भारतात आणि राज्याशी निगडीत असल्यास राज्यात दुखवटा पाळला जायला हवा.

३.५४ वैयक्तिक प्रकरणात गृह मंत्रालयाने जारी केलेल्या सुचनांनुसार परदेशी विशेष व्यक्तीच्या निधनप्रसंगी गरज असल्यास राज्यांत दुखवटा पाळला जावा आणि राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवला गेला पाहिजे.

३.५५ वर दिलेल्या तरतुदींनुसार राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवला गेला पाहिजे. पण जर प्रजासत्ताक दिवस, स्वातंत्र्यदिन, महात्मा गांधी जयंती, जालियनवाला बाग हुतात्मा स्मरण सप्ताह (६ ते १३ एप्रिल) आणि भारत सरकारने जाहीर केलेला आनंदाचा दिवस तसेच कोणत्याही राज्याच्या स्थापना दिनाच्या वेळी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवणे टाळावे. ज्या इमारतील विशेष व्यक्तींचे शव असेल केवळ त्या ठिकाणी असलेला राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवला गेला पाहिजे. अंतिम विधी पार पाडल्यानंतरच इमारतीवरचा अर्ध्यावर आणलेला झेंडा लागलीच पूर्णपणे फडकवला गेला पाहिजे.

३.५६ जर एखादी परेड किंवा संचलन करून झेंडा घेऊन दुखवटा पाळण्यात येणार असेल तर काळ्या रंगाचे कापड (क्रेप) ध्वजकाठीवर डकवण्यात आले पाहिजे. पण या काळ्या रंगाचा वापर करण्यासाठी सरकारने तसा फतवा काढणे आवश्यक आहे.

३.५७ जेव्हा झेंडा अर्ध्यावर उतरवला जातो तेव्हा आधी तो झटक्यात ध्वजस्तंभाच्या कळसापर्यंत नेऊन मग अर्ध्यावर आणावा. त्यानंतर दिवस कलण्याआधी ध्वजावतरण करताना तो याचपद्धतीने कळसापर्यंत नेऊन मग खाली उतरवावा.

***नोंद :*** झेंडा अर्ध्यावर आणणे (हाफ मास्ट) म्हणजे ध्वजस्तंभाच्या कळसापासून ते झेंड्याच्या खालच्या भागापर्यंत असलेल्या अंतराएवढा तो खाली उतरवणे. हे अंतर ध्वजस्तंभाच्या निम्मे म्हणजे गाय लाईनपर्यंत असते. १९१२ दरम्यान स्पेनमध्ये ही प्रथा अस्तित्वात आली. समुद्रातील युद्धात ॲडमिरलच्या झालेल्या निधनानंतर दुखवटा पाळण्यासाठी अशाप्रकारे झेंडा अर्ध्यावर उतरवण्यात आला. त्यानंतर इतर देशांतल्या नौदलांनी या प्रथेला अंगीकारले आणि आज संपूर्ण जगातले देश या प्रथेचे पालन करतात.



*चित्र ६९ : राज्य दुखवट्याप्रसंगी सैनिकांच्या शवपेटीवर अंथरण्यात येणारा ध्वज*



*चित्र ७० : लष्करी इतमामानुसार सुरक्षा दलाच्या शवपेटीवर अंथरण्यात येणारा ध्वज*

३.५८ राज्य/लष्करी/केंद्रीय निमलष्करी दलाच्या अंत्यविधीदरम्यान शवपेट्यांवर झेंडा गुंडाळण्यात यावा. डोक्याच्या बाजूला केशरी रंग येईल अशा तऱ्हेने राष्ट्रध्वज शवपेटीवर अंथरला गेला पाहिजे. राष्ट्रध्वज जमिनीत पुरू नये किंवा त्याला जाळू नये.

३.५९ परदेशातील राज्याच्या प्रमुखाच्या किंवा सरकारी प्रमुखाच्या दुःखद निधनप्रसंगी जर प्रजासत्ताक दिवस, स्वातंत्र्यदिन, महात्मा गांधी जयंती, जालियनवाला बाग हुतात्मा स्मरण सप्ताह (६ ते १३ एप्रिल) आणि भारत सरकारने जाहीर केलेला आनंदाचा दिवस तसेच कोणत्याही राज्याचा स्थापना दिन असल्यास त्या देशाचे मान्यताप्राप्त भारतीय शिष्टमंडळ राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवू शकते. देशाच्या कोणत्याही महत्त्वाच्या व्यक्तीच्या निधनप्रसंगी शिष्टमंडळ राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवू शकत नाही अपवाद स्थानिक प्रथा आणि शिष्टाचाराच्या नियमानुसार (गरज असेल तिथे राजनैतिक संस्थांच्या विभाग प्रमुखांनी खात्री करून घ्यावी) परकीय देशातील शिष्टमंडळ राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवू शकते.

**जय हिंद**

Lasertypeset by Ess Ess Enterprises, New Delhi and
printed at Pushpak Press Pvt. Ltd., New Delhi

The Colourful World of Flags (*Marathi*)

₹ 160.00
ISBN 812376318-2
14150559

nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया